सप्रेम मनस्कार

प्रथम आवृती
७ जुलै २००४

लेखक
सुनील वालावलकर

© सौ. मनिषा सुनील वालावलकर
१८ बी, धवलगिरी,
सोनावाला रोड,
गोरेगांव (पूर्व), मुंबई-४०० ०६३.
दूरध्वनी : २६८६४८३९

प्रकाशक
शांगीक्रांत्र
द्वारा शांताराम पाटकर
मधुबन, पांडुरंग वाडी रस्ता क्र. ५,
गोरेगांव (पूर्व), मुंबई ४०० ०६३.
दूरध्वनी : २८७६२१२०

प्रथम आवृत्ती : ७ जुलै २००४

मुद्रक
एम्.के. ग्राफिक्स्
४८-बी. एम्.बी. कवळी वाडी,
गोखले रोड (साऊथ), दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल – ९८९२६३१६०४

मुखपृष्ठ
श्री. अमोल पाटील
A.T.D. & B.F.A.
डोंबिवली (पूर्व)

सहभाग मूल्य
मूल्य रु. १५/-

माझ्या ठायी

लेखनाची आवड निर्माण करणाऱ्या

कै. तिर्थरूप भाईच्या

स्मृतीस




# प्रस्तावना

'सप्रेम मनस्कार' हा संग्रह आहे श्री. सुनील वालावलकर यांच्या विविध वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या पत्रांचा. १९८९ सालापासून गेल्या पंधरा वर्षात त्यानी लिहिलेली ही पत्रें आहेत. प्रामुख्याने महाराष्ट्र टाइम्स, महानगर, लोकसत्ता, सांज लोकसत्ता, नवशक्ति ह्या मराठी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या ह्या पत्रांमध्ये काही इंग्रजी वृत्तपत्रातील पत्रांचाही समावेश आहे. प्रदीर्घ काळ एकाच वृत्तपत्राचे संपादक म्हणून ठसा उमटविणाऱ्या संपादकांच्या संपादकीयांचे संग्रह, एखाद्या लेखमालेवरून संपादित केलेले ग्रंथ किंवा एखाद्या दीर्घकाळ चाललेल्या स्तंभलेखनांची संकलने ही जशी आपल्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध झालेली दिसतात तसे वाचकांच्या पत्रांचे नाही. 'वाचकांचा पत्रव्यवहार' हे तसे उपेक्षित दालन ! त्या दृष्टीने श्री. वालावलकर यांचा हा संग्रह, हा एक स्वागतार्ह उपक्रम ठरावा.

आपल्या ह्या पत्रप्रपंचात वालावलकर यानी विविध विषय हाताळले आहेत. त्यामध्ये 'मणीपूरचा इशारा', 'नकाराचे सामर्थ्य', 'सिंघल मनोवृत्ती' या सारखे अव्वल राजकीय लेख जसे आहेत तसेच 'रायगड किल्ल्याची चौपाटी होणार नाही याची काळजी घ्या' सारखे सामाजिक प्रश्नांवरचेही लेख आहेत. एन्रॉन, कार्यसंस्कृती, पर्यावरण, मानवी संस्कृती, इतिहास, प्रसार माध्यमे अशा विविध विषयांना लेखकाने हात घातला आहे. एका बाजूला ही विविधता आहे तर दुसऱ्या बाजूला या सर्व लिखाणामागे समाज विषयक एका चिंतनाचा समान धागा आहे.

वृत्तपत्रे, नियतकालिके आपण सर्वच वाचतो. सर्वच जण प्रसारमाध्यमांवरील कार्यक्रम ऐकतात वा पाहतात; पण बहुतेक वाचक, श्रोता वा प्रेक्षक हा निष्क्रीय (Passive) असतो. काहीजणांच्या मनात समोरील गोष्टींबद्दल संवादी वा विसंवादी प्रतिक्रिया उमटतात. अशा संवादी वा विसंवादी प्रतिक्रीया ज्यांच्या मनात उमटतात त्यानील फारच थोडे लोक त्या शब्दबद्ध करून इतरांपर्यन्त पोहचविण्यासाठी कार्यप्रवण होतात. संवादी प्रतिक्रिया देऊन दाद द्यायला वृत्तीत उमदेपणा लागतो, विसंवादी, प्रतिक्रिया देण्यासाठी धैर्य लागते तर

कार्यप्रवण होण्यासाठी उत्साह लागतो. या तीनही गुणांचा मेळ साधल्यामुळेच संग्रह तयार करावा एवढ्या प्रतिक्रिया वालावलकर यानी आजवर दिल्या आहेत.

वालावलकर हे एक सश्रद्ध गृहस्थ आहेत. मानवी समाजावर, त्याच्या विकासावर, उन्नत होणाऱ्या मूल्यरचनेवर त्यांची श्रद्धा आहे. १ मे २००१ च्या महाराष्ट्र टाईम्समध्ये 'मानवतेचा प्रवास पुन्हा टोळीयुगाकडे?' या शीर्षकाखालील त्यांचे एक पत्र आहे. मैफल ह्या सदरात ११ मार्च २००१ रोजी प्रसिद्ध झालेल्या भारतकुमार राऊत यांच्या लेखावरील ती प्रतिक्रीया आहे. हे एक छोटेसे पत्र वालावलकर कोणती श्रद्धा उराशी बाळगून आहेत त्याचे दर्शन घडवते. 'एकूण मानवतेचा प्रवास टोळीयुगाकडे होतो आहे. असे का राऊत याना सुचवायचे आहे?' असा प्रश्न विचारून ते लिहितात, 'मूठभर राज्यकर्त्यावर्गावरून संपूर्ण मानवजातीविषयीचा असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. दोन जागतिक महायुद्धानंतर तिसऱ्या जागतिक युद्धाची धूसर शक्यतासुद्धा दिसत नाही. याचाच अर्थ जगभरातील बहुसंख्य लोकांचा कल शांततामय सहअस्तित्वाने जीवन जगण्याकडे आहे, असा होतो. याचे श्रेय सत्ताधिशांकडे नसून, जगभरातील शांतताप्रिय सुसंस्कृत नागरिकांच्या सामुहिक इच्छाशक्तीला आहे.'

सश्रद्ध माणसाची श्रद्धा बळकट व्हावी असेच अनुभव त्यांना नेहमी येत नाहीत. विपरीत अनुभव जेव्हा येतात तेव्हा श्रद्धेला हादरा बसतो व सश्रद्धा माणूस व्यथित होतो. वालावलकरही खरे सश्रद्ध असल्याने असे व्यथित होताना त्यांच्या काही पत्रांमधून दिसतात. 'मध्यमवर्गाचा उलटा प्रवास (महाराष्ट्र टाइम्स ९ जुलै २०००)' व 'परखड परिसंवाद (महानगर १९ जानेवारी १९९७)' ही दोन पत्रे या गोष्टीची उदाहरणे आहेत. 'मध्यमवर्गाचा उलटा प्रवास'मध्ये आपली व्यथा सांगताना वालावलकर लिहितात— 'तात्वीकदृष्ट्या, आणीबाणी म्हणजे लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी, ही वस्तुस्थिती मान्य करून सुद्धा मूलभूत मुद्दा उरतोच; तो म्हणजे, आणीबाणीनंतरच्या काळात देशातील मध्यमवर्गात लोकशाहीविषयी आदर वाढला की कमी झाला? आणीबाणीला विरोध करण्यात आघाडीवर असलेल्या व्यक्ती ज्या मध्यमवर्गातून आल्या होत्या, तो मध्यमवर्ग आज उघडपणे लोकशाहीच्या विरुद्ध वाटचाल करताना दिसतो.' 'परखड परिसंवाद' ह्या शीर्षकाखालील पत्रात याच मध्यमवर्गाबद्दल वालावलकर म्हणतात, 'फॅसिस्ट वृत्तीच्या लोकांनी पद्धतशीरपणे समाजमनाचं बकालीपण घडवून आणलं. त्यामुळे निर्माण झालेला अभिरूचीशून्य समाज आज निमूटपणे युती सरकारचे अपराध सहन करतो आहे.'

विपरीत अनुभवांमुळे वालावलकर व्यथित होत असले तरी ते खरे सश्रद्ध असल्यामुळे हताश होत नाहीत. 'परखड परिसंवाद'मध्येच वास्तव व्यक्त केल्याबद्दल 'परखड' वक्त्यांचे आभार मानून वालावलकर त्यांना उद्देशून लिहितात, 'या परिसंवादामुळे पुष्पाताई भावे, कुमार केतकरांसारख्या विचारवंतांची जबाबदारी आणखी वाढली आहे, कारण त्यांनी सध्याच्या समाजाचे नेमके दुखणे कोणते आहे ते अचूकपणे दाखवले, परंतु भावी पिढीने या विचारवंतांचे ऋण मान्य करावे असे जर वाटत असेल तर त्यानी समाजाला ह्या दुखण्यातून बरे कसे व्हायचे याचेही मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.' रोगाच्या दर्शनाने वालावलकर व्यथित होत असले तरी त्यांना उत्सुकता आहे ती रोगावरील उपचाराविषयीची. त्यांची ही वृत्तीच या पत्रप्रपंचाची ताकद आहे.

पत्रांमधील ही ताकद आणि त्यामागची श्रद्धा ही वालावलकरांनी वैचारीक बैठकीतून जोपासली आहे. अनेकदा फुटकळ लिखाणात एक दोष आढळतो आणि तो म्हणजे दोन वेगवेगळ्या काळात केलेल्या लिखाणात परस्पर विरोधी विधाने वा विचार येण्याचा ! हा दोष वालावलकर यांच्या पत्रलिखाणात आढळत नाही. याचा अर्थ पहिल्या पत्रापासून शेवटच्या पत्रापर्यंत एकाच परिपक्वतेचे विचार व्यक्त होतात असे नव्हे, ते शक्यही नाही कारण पत्रें संख्येने चाळीसच्या आत असली तरी ती पंधरा वर्षात लिहिलेली आहेत. १९८९ साली त्यांच्या श्रद्धा त्याच असल्या तरी पुढील पंधरा वर्षात त्या श्रद्धा अभ्यासाने अधीक पक्क्या झाल्या आहेत व लिखाणात अधिक पक्केपणा आलेला आहे. हा पक्केपणा आशयात ही जाणवतो व त्याच्या विस्तारातही. आधीची पत्रें व नंतरची पत्रे यांची लांबी पाहिली तरी विचारातील हा फरक लगेच जाणवतो. प्रारंभीची पत्रें काही ओळीत संपतात; पण गेल्या दोन वर्षात पत्रे म्हणून त्यानी स्वतंत्र छोटेखानी लेखच त्या विषयांवर लिहिलेले आहेत.

माणसाच्या ज्या श्रद्धा असतात व त्यांना बळकटी देणारी जी विचार प्रणाली असते ती अनेकदा एक वा अनेक व्यक्तींच्या रूपाने साकारते. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत स्वातंत्र्य, समता, सर्वधर्म समभाव, लोकशाही ही जी मूल्ये राष्ट्रीय मूल्ये म्हणून सिद्ध झाली ती मूल्ये वालावलकरांचे श्रद्धा स्थान आहे. राज्यघटनेत तीच मूल्य ग्रथित झाली आणि पुढे स्वतंत्र भारताची राष्ट्र म्हणून उभारणी त्या मूल्यांना धरूनच झालेली आहे. म.गांधी, पंडित नेहरू, इंदिराजी, राजीवजी आणि आता सोनियाजी ह्या व्यक्ती त्या मूल्यांची प्रतिके बनतात. वालावलकरांची त्या मूल्यांवरची श्रद्धा ही ह्या व्यक्तिवरील श्रद्धा म्हणून व्यक्त होते. आपल्या

देशातील राजकारणाला आणि समाजकारणाला गेल्या काही वर्षात असे काही वळण लागले आहे की ह्या त्यांच्या श्रद्धेय मूल्यांवर हल्ला होतो आहे. ती मूल्ये जपणाऱ्या श्रद्धेय व्यक्तींवर हल्ला होतो आहे अशा वेळी वालावलकरांचे पत्रलेखन आक्रमक बनते व एक राजकीय भूमिकेच्या प्रचाराचे प्रभावी माध्यम म्हणून पुढे येते.

हा प्रचार करणे हा पत्रलेखनाचा हेतू असल्याचे अर्थातच ते दडवत नाहीत आणि माझ्या दृष्टीने इतर राजकीय कार्यकर्त्यांनी ही ह्या दृष्टीनेच अनुकरणीय उपक्रम म्हणून ह्या पत्रलेखनाकडे पाहणे गरजेचे आहे. आपल्याला जे वाटते ते इतरांना सांगणे म्हणजे प्रचार होय. हा प्रचार करणे हे प्रत्येक लोकशाहीवादी नागरीकाचे कर्तव्य आहे. असा निकोप प्रचार हीच लोकशाहीची हमी आहे. लोकशाहीची व्याख्या आपण 'लोकांची, लोकांसाठी, लोकांकडून चालवली जाणारी राज्यपद्धती.' अशी करतो. निवडणूकांद्वारे निवडून दिलेले लोक राज्य करतात या दृष्टीने 'लोकांची' ही एक अट पूर्ण होते. अशा निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींनी लोकांना हवा असा कार्यक्रम घेऊन 'लोकांसाठी' ही दुसरी अट पूर्ण करावी अशी अपेक्षा असते. पण 'लोकांकडून' ही तिसरी अट बहुदा लोकशाहीमध्ये पूर्ण होत नाही. प्रसार माध्यमे ही सर्वसामान्य लोकांच्या वैचारीक देवाणघेवाणीची व्यासपीठे बनवून हे काही प्रमाणात तरी करता येणे शक्य आहे. परंतु लोकशाहीवर श्रद्धा असणारे अगदी स्वत:ला राजकीय कार्यकर्ते म्हणवणारे लोकही ह्या बाबतीत उदासीन असतात. ज्यांचा लोकशाहीवर विश्वास नाही अशी मंडळी अनेकदा वृत्तपत्रासारखी व्यासपीठे 'गोबेल्सपद्धतीच्या' प्रचारासाठी वापरताना दिसतात पण त्यांना प्रतिवाद ज्यांनी करायचा ते तो करत नाहीत. आपल्या शक्तीप्रमाणे सुनील वालावलकर हे काम गेली पंधरा वर्षे करत आहेत. त्यांचे अभिनंदन ! हा संग्रह इतरांनाही असे काम करायला स्फूर्ती देईल अशी अपेक्षा ठेऊन वालावलकरांना त्यांच्या ह्या कार्यासाठी शुभेच्छा !

अरविंद वैद्य
आर. ८ सेक्टर ९,
सी.बी.डी. नवी मुंबई
४००६१४
दूरभाष – २७५७४३८१

# अनुक्रमणिका

१. महाकाव्याची महानायिका १३
२. दुतोंडी की मुत्सद्दी? १४
३. मोबाईल प्रचार रोखा १५
४. लोकभावनेचा अनादर करणाऱ्यांना 'मणिपूर'चा इशारा १६
५. देशाची अखंडता आणि प्रगती यांच्या आड येणारी 'सिंघल मनोवृत्ती' १८
६. मानवतेचा प्रवास पुन्हा टोळीयुगाकडे ? २०
७. भाजपच्या अजेंड्याआड येणारा राज्यघटनेचा अडसर दूर करावा ! २१
८. कौ.ब.क. सारख्या मालिकांमधून फसवणूक होऊ नये, म्हणून... २३
९. केबल-संस्कृतीचे घातक परिणाम २५
१०. मध्यमवर्गाचा उलटा प्रवास २७
११. समाजापुढील खरे सांस्कृतिक संकट ! २९
१२. घरच्या म्हातारीचे काळ! ३१
१३. सामंतवाडीचे दुखणे ३३
१४. केवळ गांधी-कुटुंबाचीच आजवर संघपरिवाराच्या विरोधात लढाई ३५
१५. डोंबिवलीतील अभिनव गुढीपाडवा ३७
१६. विपश्यनेवरचा लेख आवडला ३८
१७. प्रत्येकाने स्वातंत्र्य दिन साजरा करावा ३९

१८. पूर्वग्रहदूषित भूमिका ४०
१९. थोर व्यक्तिमत्त्वांच्या टवाळीत धन्यता मानणाऱ्यांना चपराक ४१
२०. 'मार्केटिंग' म्हटल्याने काय बिघडते? ४३
२१. परखड परिसंवाद ४५
२२. मालवणी भाषा म्हणजे फक्त शिव्या नव्हेत ! ४६
२३. Rush for cold drinks and gifts at AGMs ४७
२४. असूयेचे शिकार ४९
२५. मतदारांना 'मामा' बनविण्याची चाल ५०
२६. शहरी स्त्रियांचा निरुत्साह खटकणारा ५१
२७. रायगड किल्लाची चौपाटी होणार नाही याची काळजी घ्या ५२
२८. जनतेच्या कल्याणाचा खेळखंडोबा ५३
२९. Insured Security ५४
३०. डोंबिवलीतील वृक्षांना तरी जगू द्या ! ५६
३१. मग 'राष्ट्रसेवक' म्हणून कशाला मिरवता? ५७
३२. National glory ५८
३३. विश्वसुंदरी स्पर्धेकडे पाहाण्याचा दृष्टीकोन तपासावा लागेल ५९
३४. In support of Sonia ६०
३५. Privileged lot ६१
३६. म्हणे आम्ही सुसंस्कृत नागरिक ! ६३
३७. कल्पकतेच्या मर्यादा ६४
३८. इंदिरा गांधींवर अन्याय ६५
३९. सुटका नाही ६७
४०. हाश्मी समारोहात खटकलेली गोष्ट ६८
४१. वृत्तपत्रात न छापून आलेली पत्रं ७०

# मनोगत

प्रत्येक उच्चारित किंवा लिखित शब्द व्यक्तीच्या मनोव्यापारामधूनच तयार होत असतो. त्यानुसारच माझा पत्रव्यवहार सुरु असतो. विविध प्रसंगपरत्वे माझ्या मनात विचार कल्लोळ उमटत असतात, प्रतिक्रिया द्याव्याशा वाटतात... मी वेळोवेळी असे विचार पत्ररुपाने वर्तमानपत्रांनां पाठवत असतो. गेल्या १५ वर्षांतील काही प्रकाशीत तसेच अप्रकाशीत पत्रांचा हा संग्रह. प्रस्तुत पत्रांच्या संग्रहास 'सप्रेम नमस्कार' न म्हणता 'सप्रेम मनस्कार' असं शिर्षक मात्र एखाद्या जातीवंत कवीलाच सुचण शक्य आहे, म्हणून मी माझे कवीमित्र डॉ. महेश केळुसकरांचे मन:पूर्वक आभार मानतो.

आम्हां तिघां भावांमधल्या अनिलचे सासरे श्री. शांताराम पाटकर हे एक वेगळेच व्यक्तिमत्व आहे. तस बघता माझे आणि सर्वात लहान भाऊ डॉ. सुशीलचे सासरे ही सुद्धा अफलातूनच मंडळी आहेत.

'अफाट उर्जा' हा या तिघांच्या स्वभावातील एक समान गुणधर्म. प्रत्येकाची कार्यक्षेत्रे वेगवेगळी आहेत, परंतु उत्साहाचा अक्षय साठा तिघांकडेही भरपूर आहे. सुशीलची पत्नी सौ. सुभाषिनीचे 'अण्णा' धार्मिक कार्यासाठी पंचाहत्तराव्या वर्षीसुद्धा उभा भारत पालथा घालत असतात तर सौ. मनिषाचे 'बाबा' गव्हाणकर जमीन जुमल्याच्या व्यवहारांसाठी या वयातसुद्धा जीवाचं रान करत असतात.

सौ. रेश्माचे बाबा म्हणजे एस्. आर. पाटकर मात्र पुस्तकात आणि साहित्यात रस घेणारे आहेत. गोरेगांवात राहून डोंबिवलीची शाळा आणि वाचनालय चालवण्याची त्यांची जिद्द स्फूर्तीदायक आहे. 'एस्.आर.' योगासनांच्या बाबतीत दक्ष असल्यामुळेच खाण्यापिण्याच्या बाबतीनसुद्धा ते चोखंदळ राहू शकले आहेत. प्रापंचिक जबाबदाऱ्या सांभाळून श्री. पाटकरांनी आतापर्यंत तब्बल १० पुस्तकं प्रकाशित केली आहेत. एवढं सगळं ते मोठ्या रसिकतेने करत असतात हे विशेष. याच त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांचा मला फायदा झाला.

विविध वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध झालेल्या माझ्या पत्रांचा संग्रह करण्याविषयीचा माझा विचार श्री. पाटकरांनीं नम्रतेने उचलून धरल्यामुळेच अशा प्रकारचा संग्रह प्रकाशित होत आहे याची मला जाणीव आहे. साहजिकच या पुस्तिकेचं मोटं श्रेय श्री. पाटकर आणि त्यांचे मुद्रकमित्र श्री. मुकेश पुरी यांच्याकडे जातं.

या ठिकाणी माझ्या व्यापक मित्रपरिवाराचासुद्धा उल्लेख केला पाहिजे, कारण मूळात वर्तमानपत्रांनां पत्रं पाठवण्याची प्रेरणा माझ्या मित्रांकडूनच मला मिळाली आहे. सकाळी ९.०१ च्या गोरेगांव लोकलमधले माझे सहप्रवासी, ऑफीसमधले माझे सहकारी आणि विविध चळवळी आणि माध्यम क्षेत्रांतील माझ्या कार्यकर्त्या मित्रांबरोबरच्या वैचारिक घुसळणीमुळेच मी लिहिता झालो. लिखाणाच्या आतापर्यंतच्या प्रवासात आकाशवाणी, युनिक फिचर्स आणि साप्ताहिक सकाळचं योगदान सुद्धा तेवढंच मोलाचं आहे.

माझे हितचिंतक माझ्या लिखाणाची नोंद घेत असतात याचं कारण मला वाटतं माझ्या लिखाणावर माझ्या आईच्या विचारांची आणि संस्कारांची उमटलेली छाप हे आहे. त्याबद्दल आईविषयी ऋण मानून त्यातून उतराई होण्याची अपेक्षा आणि इच्छाही नाही, ते औद्धत्य मी करू इच्छित नाही.

जेष्ठ शिक्षण तज्ञ श्री. अरविंद वैद्य यांची मौल्यवान प्रस्तावना माझ्या पुस्तिकेला लाभली त्याबद्दल मी खरोखरीच स्वत:ला भाग्यवान समजतो. ज्या शाळेत मी शिकलो त्या शाळेचे मुख्याध्यापक असलेल्या वैद्य सरांच्या संपर्कात मी १९७४ सालापासून आलो. मला आठवतंय, दहावीच्या वर्षी वैद्य सरांनी माझ्या पालकांच्या नावे एक चिठ्ठी लिहिली होती. केवळ त्या चिठ्ठीच्या जोरावर त्या वर्षीच्या शाळेच्या सहलीला जाण्याची मला घरून परवानगी मिळाली होती. आज तब्बल २५ वर्षांनी वैद्यसरांची प्रस्तावना माझ्या पुस्तिकेला मिळते आहे, हा एक सुंदर रौप्यमहोत्सवी योगायोग म्हटला पाहिजे. माझ्या विचारांना योग्य दिशा दाखवण्यामध्ये वैद्यसर आणि त्यांच्या वैचारिक परिवाराचा हातभार असल्यामुळे त्यांचा मला नेहमीच आदर वाटत आला आहे. जोडीला माझ्या पुस्तिकेला प्रस्तावना लिहिण्याचं मान्य केल्याबद्दल वैद्यसर आणि माझे मित्र श्री. दत्ता बाळसराफ या दोघांचा मी आभारी आहे.

दै. महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, आपलं महानगर सारख्या प्रथितयश दैनिकांमधून माझी पत्रं प्रसिद्ध झाली, त्याबद्दल त्या सर्व वर्तमानपत्रांच्यां संपादकांचे आभार मानणं मी माझं कर्तव्य समजतो.

ही पुस्तिका प्रकाशित करण्यामागे माझा साहित्यिकअविर्भाव किंवा अभिनिवेश नाही याची माझे वाचक नोंद घेतीलच तरीसुद्धा वाचकांच्या सूचनांच आणि प्रतिक्रियांच मी नेहमी स्वागतच करीन असं सांगून शुभेच्छांसह हे मनोगत संपवतो.

दिनांक : ७ जुलै २००४

- सुनील वालावलकर

# महाकाव्याची महानायिका

देशाच्या पंतप्रधानपदावरचा स्वत:चा न्याय्य हक्क विनम्रपणे नाकारून सोनिया गांधींनी एक तेजस्वी इतिहासच घडवला आहे. धर्मांध शक्तीच्या मगरमिठीमधून भारताची मुक्तता करणाऱ्या श्रीमती गांधींचे व्यक्तिमत्त्व यामुळे अधिकच झळाळून निघाले आहे. एखाद्या महाकाव्याच्या महानायिकेला साजेसा हा सारा घटनापट आहे. उर्मट आणि असंस्कृत राजकीय विरोधकांशी दोन हात करून सोनियांनी मिळवलेले यश दीपस्तंभाप्रमाणे उठून दिसत आहे. त्यांच्या विरोधात प्रचाराची पातळी हीन दर्जाची होऊनसुद्धा सर्व विरोधक भुईसपाट झाले. याचे निम्मे श्रेय इथल्या सुज्ञ मतदारांना जसे आहे, तसेच ते सोनियांजींच्या आदर्शवादी जीवनशैलीलासुद्धा आहे. बेजबाबदार सहकाऱ्यांना बरोबर घेऊन असभ्य विरोधकांशी लढतानाच्या दोन गांधींच्या अनुभवांची कल्पना श्रीमती सोनियांना असल्यामुळे नकाराचा त्यांचा निर्णय योग्यच म्हटला पाहिजे. सभ्य विरुद्ध असभ्य आणि सत्य विरुद्ध असत्याच्या लढाईत या आधी तीन गांधींनी त्यांच्या प्राणाची आहुती दिली आहेच. त्यात आणखी एका गांधींचं व्यर्थ बलिदान होऊ नये म्हणून सोनियांच्या या निर्णयाचा सर्वांनी आदर केला पाहिजे.

लोकसत्ता
२८ मे २००४

## दुतोंडी की मुत्सद्दी?

ज्या बाबरी कांडामुळे देशाच्या सर्वसमावेशकतेला खरे म्हणजे तडा गेला होता, त्या सत्यावद्दल उपपंतप्रधान अडवाणी यांनी माफी मागावीशी वाटत नाही. मात्र तेच अडवाणी सत्ताधारी पक्षाने सर्वसमावेशक असले पाहिजे असे सांगतात. त्यांच्या अशा दुतोंडीपणाबद्दल त्यांना दोषी मानायचे की त्यांच्या मुत्सद्दीपणाचे कौतुक करायचे?

**लोकसत्ता**
१६ एप्रिल २००४



## मोबाईल प्रचार रोखा



मोबाईल फोनमार्फत पंतप्रधानांचा संदेश मतदारांना ऐकवण्याची भाजपाची योजना कल्पक असली तरी मतदारांनी त्याचा नाहक भुर्दंड का सोसावा? समजा मोबाईलधारक त्याच्या नेटवर्ककक्षेच्या बाहेर असताना त्या ठिकाणी पंतप्रधानांचा प्रचारकी दूरध्वनी आल्यास त्यासाठीचं रोमिंग शुल्क कोणी भरायचं? कदाचित अशा प्रकारच्या दूरध्वनीचं रोमिंग शुल्क भाजपा माफसुद्धा करू शकेल. तरीसुद्धा लोकांच्या खासगी आयुष्यावर होणाऱ्या आक्रमणाची भरपाई कशी काय भरून काढणार? यासंबंधी ग्राहक न्यायालयाकडे किंवा निवडणूक आयोगाकडे दाद मागता येऊ शकेल का?

**लोकसत्ता**
२५ मार्च २००४

# लोकभावनेचा अनादर करणाऱ्यांना 'मणिपूर'चा इशारा

व्यापक जनसेवेसाठी राजकारणात सक्रिय असल्याचा दावा अनेक पुढारी करत असतात. परंतु हल्ली याच पुढारी मंडळींकडून सामान्य लोकांच्या भावनेचा अनादर करण्याच्या घटना घडत आहेत. त्याबद्दल अशा पुढाऱ्यांना इशारा देणे गरजेचे आहे.

एन्रान प्रकरणात राज्य सरकारच्या झालेल्या कोंडीच्या मुळाशी, कंपनीशी करण्यात आलेले दोन्ही करारच कारणीभूत आहेत, त्यामुळे हे करार ज्या राजकारण्यांनी आणि सनदी अधिकाऱ्यांनी केले. त्यांच्या हेतूंविषयी आणि कुवतीबद्दल सामान्यांच्या मनात प्रश्नचिन्ह उमटणे स्वाभाविकच आहे. या पार्श्वभूमीवर शरद पवार जेव्हा सांगतात की, त्यांना त्यांच्याविषयी पसरलेल्या गैरसमजाबद्दल फिकीर वाटत नाही, तेव्हा राजकारणी व्यक्ती लोकभावनेला किती किंमत देतात, हे समजून येते. शरद पवार हे मोजूनमापून विधाने करणारे राजकारणी म्हणून प्रसिद्ध आहेत, असे तेच जर सामूहिक लोकभावनेला किंमत देणार नसतील, तर अन्य मुजोर राजकारण्यांकडून कसली अपेक्षा धरायची!

नागपुरातील अभय पुंडलिक प्रकरणात नितीन गडकरीसुद्धा लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. साक्षात सीबीआयला सापडणार नाही. इतका सज्जड पुरावा अभय पुंडलिक प्रकरणी सामान्य लोकांना घरबसल्या बघायला मिळालेला असताना नितीन गडकरींची त्यांच्या पक्षाला वाचवण्याची धडपड केविलवाणी वाटते. तहलकाकांडाइतकेच अभय पुंडलिक प्रकरण गंभीर असताना, स्वच्छ चारित्र्याचा भाजपाचा दावा लोकांनी कितीकाळ सहन करायचा? सामान्य लोक माझे काय बिघडवणार आहेत, अशा उर्मट विचारप्रवाहास प्रामुख्याने जबाबदार असलेल्या पुढारी व्यक्तींकडून एकच अपेक्षा आहे की, त्यांनी त्यांच्या कर्तृत्वावर भरपूर श्रीमंत जरूर व्हावे, परंतु त्या प्रवासातील त्यांच्या कृत्यांचे समर्थन करताना त्यांनी लोकभावनेचा किमान आदर जरूर बाळगावा.



सर्वसामान्य लोकांची फिकीर न वाटणाऱ्या राजकारण्यांची मणिपूरमध्ये काय दुर्दशा झाली, याचे उदाहरण ताजेच आहे. पवार, गडकरी आदी पुढाऱ्यांनी यापासून योग्य तो बोध घ्यावा.

महाराष्ट्र टाइम्स

२७ जून २००१

## देशाची अखंडता आणि प्रगती यांच्या आड येणारी 'सिंघल मनोवृत्ती'

एक सच्चा हिंदू या नात्याने विश्व हिंदू परिषदेचे अशोक सिंघल यांच्या, धर्मनिरपेक्षतेला हद्दपार करण्याच्या मागणीचा मी निषेध करु इच्छितो. मुळात अशोक सिंघल हे स्वयंघोषित अतिरेकी हिंदू पुढारी असल्यामुळे सर्व हिंदूंच्या वतीने ते बोलत आहेत, असे समजण्याची गरज नाही.

समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता या नेमक्या दोन तत्त्वांमुळेच देश एकसंघ राहून आतापर्यंतची प्रगती शक्य झाली आहे. याच दोन तत्त्वांचा स्वीकार, ज्या शेजारी राष्ट्रांनी केला नाही, त्यांची आजची अवस्था काय आहे, याची प्रत्येकालाच जाणीव आहे, त्यामुळे सिंघल यांची मागणी आत्मघातकीच मानली पाहिजे. उत्तर प्रदेशसारखे सुपीक राज्य मागास असण्यामागे, सिंघल यांच्यासारख्यांची जहाल आणि टोकाची मनोवृत्ती कारणीभूत आहे. त्यामुळे महाराष्ट्राचा उत्तर प्रदेश किंवा बिहार होऊ द्यायचा नसेल, तर उत्तर भारतीय आठमुठ्या वृत्तीला महाराष्ट्रात प्रोत्साहन मिळता कामा नये.

हिंदूंच्या कथित अपमानाबद्दल सिंघल एवढा कांगावा करतात, तो दावा किती पोकळ आहे, हे लोकसंख्येतील हिंदूंच्या टक्केवारीने स्पष्ट होऊ शकते. एकूण लोकसंख्येच्या चार-पंचमांश एवढ्या प्रचंड हिंदू समाजाचा कोणी कितीही ठरवले, तरी अपमान करु शकत नाही, हे वास्तव समजण्याइतपत प्रगल्भता खऱ्या हिंदूकडे उपजतच असते. धर्माचा अपमान आणि समाजाचे आर्थिक हित यामधला फरक समजण्याचा समंजसपणा उत्तर प्रदेशात नसला, तरी महाराष्ट्रात निश्चित आहे, हे विश्व हिंदू परिषदेला ठणकावून सांगण्याची वेळ आली आहे.



महाराष्ट्रातील सामान्य जनतेने सुधीर फडके, लता मंगेशकर, आशा भोसले यासारख्या कलाकारांना आकाशाएवढे मोठे केले. त्यामुळे त्यांच्याकडून अशी अपेक्षा होती की, ही कलावंत मंडळी बहुजनांच्या हितासाठी योग्य ती भूमिका घेतील. पण दुर्दैवाने अलीकडच्या घडामोडींमधून या कलाकारांच्या मातीच्या पायांचेच दर्शन घडले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
३ मे २००१

## मानवतेचा प्रवास पुन्हा टोळीयुगाकडे ?

'इतिहासाचे मारेकरी' (मैफल ११ मार्च २००१) हा भारतकुमार राऊत यांचा लेख वाचला. अख्ख्या जगात आता कोणीच सुसंस्कृत नागरिक उरलेलाच नाही, अशी समजूत प्रस्तुत लेख वाचून झाली. संपूर्ण मानवजात विकृत झाली असेल, तर मग सृष्टीच्या वाढत्या पसाऱ्यामागे कोण आहे, असा प्रश्न लेखातील सर्व उदाहरणे वाचून पडला. प्रत्येक माणसात जर का पशुत्व दडलेलं आहे, तर मग एकूण मानवतेचा प्रवास टोळीयुगाकडे होतो आहे, असे का श्री. राऊत यांना सुचवायचे आहे? माझ्या मते मूठभर राज्यकर्त्यांवर्गावरून संपूर्ण मानवजातीविषयीचा असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. दोन जागतिक महायुद्धांनंतर तिसऱ्या जागतिक युद्धाची धूसर शक्यतासुद्धा सध्या दिसत नाही. याचाच अर्थ, जगभरातील बहुसंख्य लोकांचा कल शांततामय सहअस्तित्वाने जीवन जगण्याकडे आहे, असा होतो. याचे श्रेय सत्ताधीशांकडे नसून, जगभरातील शांतताप्रिय सुसंस्कृत नागरिकांच्या सामूहिक इच्छाशक्तीला आहे आणि म्हणूनच तालिबानविरुद्धचा सध्याचा जागतिक निषेध समर्थनीय आहे. तालिबानी प्रवृत्तींचा निषेध करणाऱ्यांच्या पूर्वसुरींनी इतिहासाची मोडतोड केली, म्हणून आमच्या नागरिकांना अतिरेक्यांविरुद्ध आवाज उठविण्याचा हक्क नाही, हा लेखाचा सूर पटणारा नाही.

महाराष्ट्र टाइम्स
१ एप्रिल २००१



## भाजपच्या अजेंड्याआड येणारा राज्यघटनेचा अडसर दूर करावा !

क्रिकेट सामने आणि राष्ट्रभक्तीचा जसा कसलाही संबंध नाही, त्याप्रमाणे सर्वधर्मसमभावाच्या तत्त्वाचे आणि भाजपचे अजिबात नाते नसल्याचे, गेल्या काही दिवसांमधल्या घटनांनी सिद्ध केले आहे. क्रिकेट मंडळाने, सौदेबाजी प्रकरणातील सहभागी खेळाडूंवर बंदी घालण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे क्रिकेटप्रेमींना धक्का बसला असला, तरीसुद्धा त्यामुळे एक गैरसमज दूर झाल्याचे समाधानही जरूर मिळाले आहे.

बाबरी मशीद तोडल्यानंतर, ज्या जातीय दंगली घडल्या, त्याच्यापाठी असलेल्या अनेक कारणांपैकी क्रिकेट सामने हे सुद्धा एक प्रमुख कारण होते, भारत-पाक सामन्यांच्या वेळी भेंडीबाजारात फटाक्यांचे आवाज ऐकू येतात, या ऐकिव बातमीच्या आधारे, इथले एकजात सर्व मुस्लिम पाकधार्जिणे असल्याचा प्रचार इथल्या प्रमुख हितसंबंधी संघटनांनी केला होता. असल्या बिनबुडाच्या प्रचाराने प्रभावित झालेल्या सामान्यांनी पुढे घडलेल्या भीषण जातीय दंगलींना इंधन पुरवले होते. हा सर्व इतिहास आठवणीत ताजा असतानाच एकूण सर्व क्रिकेट जगताचे सारे स्वरुप उघड झाल्यामुळे नागरिकांचा चांगलाच भ्रमनिरास झाला आहे.

क्रिकेट खेळाला देशप्रेमाचे प्रतिक मानण्याची चूक किती महागडी ठरू शकते, याची झालेली जाणीव म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण असले, तरी त्याचे स्वागत केले पाहिजे.

क्रिकेटपटूंच्या तुलनेत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी आपला खरा चेहरा फारच लवकर उघड केला. संघाचा आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा अजेंडा

वेगवेगळ्याअसल्याची ग्वाही भाजपचे अध्यक्ष आणि स्वत: पंतप्रधान अनेक प्रकारांनी देत असायचे. विरोधी पक्षांचा अर्थात त्यांच्या असल्या बोलण्यांवर विश्वास नव्हताच; परंतु आघाडीतील इतर मित्रपक्ष सत्तेच्या गाजरापायी पंतप्रधानांच्या मुखवट्यावर भरवसा ठेवून सत्ताकारण करत होते. राममंदिर प्रकरणी पंतप्रधानांनी केलेल्या ताज्या स्पष्टोक्तीमुळे भाजपच्या मित्रपक्षांची चांगलीच अडचण झाली असून या पक्षांच्या कोलांटयाउड्या मनोरंजक ठरणार आहेत.

क्रिकेट जगातचे खरे स्वरुप जनतेसमोर आणल्याबद्दल ज्याप्रमाणे हॅन्सी कोनिए आणि मनोज प्रभाकरचे आभार मानले पाहिजेत. त्याप्रमाणे भाजपचा छुपा अजेंडा एवढ्या लवकर उघड केल्याबद्दल पंतप्रधानांचे आपण सर्वांनी ऋणी असले पाहिजे.

निवृत्तीच्या मार्गावर असलेल्या कलंकित क्रिकेटपटूंना केवळ खेळबंदीची शिक्षा सुनावून, त्यांना एकप्रकारची माफीच देण्यात आली आहे. त्याच न्यायाने पंतप्रधानांनी स्वत:च्या हेतूंची स्वच्छ कबुली दिल्यामुळे भारतीयांनी पंतप्रधानांना माफ करावे, हे उत्तम !

आता फक्त पंतप्रधानांनी राज्यघटनेचा अडसर तेवढा दूर करावा; कारण सध्याच्या राज्यघटनेची शपथ घेऊनच ते राज्यकारभार करीत आहेत आणि त्या राज्यघटनेचा आत्मा म्हणजे सर्वधर्मसमभाव हे तत्त्व आहे.

महाराष्ट्र टाइम्स
२० डिसेंबर २०००



## कौ.ब.क. सारख्या मालिकांमधून फसवणूक होऊ नये, म्हणून...

सध्या कौन बनेगा करोडपती हा कार्यक्रम लोकप्रियतेच्या शिखरावर आहे. कौ.ब.क.ला मिळत असलेला वाढता प्रतिसाद बघून त्याच धर्तीवर असंख्य कार्यक्रम विविध चॅनल्सवर येण्याच्या मार्गावर आहेत. सध्याच्या पराकोटीच्या व्यावहारिक जगात कोणताही उपक्रम निव्वळ नफा-तोटयाचा विचार करून आयोजित केला जातो. त्यातून विविध चॅनल्सच्या गळेकापू स्पर्धेच्या जगात तर नफा कमावण्याच्या नव्या संधीचाच शोध घेतला जात असतो. कौ.ब.क. कार्यक्रमसुद्धा सामान्यजनांच्या ज्ञानात भर पडावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आला नसून स्टार. टी.व्ही.ला बेफाम नफा व्हावा याच हेतूने खेळवला जात आहे.

कौ. ब. का.च्या कार्यक्रमात अशा लोकांनाच प्रवेश मिळतो की, दूरध्वनीद्वारे स्टार टी.व्ही. वाल्यांनी संपर्क करण्यात यशस्वी होतात. कौ. ब. क. च्या अशा स्वरुपामुळे स्टार टी.व्ही.बरोबरच महानगर टेलिफोन निगम आणि विदेश संचार निगम या सरकारी कंपन्यांच्या उत्पन्नातसुद्धा भर पडते आहे. असा स्टार टी.व्ही. वाल्यांचा दावा आहे. त्यामुळे कौ. ब. क. चे निर्माते, टेलिफोन कंपन्यांकडून त्यांच्या कथित वाढीव उत्पन्नातील हिश्श्याची मागणी करत आहेत. टेलिफोन कंपन्यांची स्टार टी.व्ही.ला अशा प्रकारचा हिस्सा द्यावा की न द्यावा, हा त्या कंपनीचा अंतर्गत मामला आहे. पण टेलिफोन कंपन्यांच्या ग्राहक नागरिकांनी मात्र अशी मागणी जरुर केली पाहिजे की, कौ. ब. क. सारख्या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी जो दूरध्वनी करावा लागतो, त्याचा दर व्यावसायिक पद्धतीने आकारण्यात यावा. काही वर्षापासून ज्याप्रमाणे टपाल खात्यातर्फे स्पर्धात्मक पोस्टकार्डे प्रचारात आणली आहेत, त्याच आधारे टी.व्ही. मालिकेतील स्पर्धेत सहभागी होण्यासाठी कराव्या लागणार दूरध्वनीसुद्धा प्रचलित दरापेक्षा महाग करावा. अशी मागणी करण्यामागे आणखी एक कारण आहे.

सध्या कौ. ब. क. सारख्या कार्यक्रमातून मिळणारी बक्षिसाची रक्कम प्राप्तिकर मुक्त करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अशी मागणी करणाऱ्यांच्या मते अशा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांनी कोणत्याही प्रकारची रोख गुंतवणूक केलेली नसते. त्यामुळे विजेत्यांना मिळणारी रक्कम 'उत्पन्न' न समजता 'भेट' म्हणून गृहीत धरावी. या प्रकारच्या लोभी युक्तिवादामध्ये तथ्य जरूर आहे, म्हणूनच या स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी जो दूरध्वनी करावा लागतो, त्याच्या दराची आकारणी महाग करावी. जेणेकरून असा वाढीव दर प्रवेशशुल्क म्हणून गृहीत धरला जाईल आणि आपोआप बक्षिसांच्या रकमा करपात्र ठरतील.

सध्या बाजारावर आधारित अर्थव्यवस्था प्रचलित असल्यामुळे चतुर विक्रीतज्ञ येनकेन प्रकारे सामान्य लोकांच्या भावनांचे भांडवल करण्याच्या प्रयत्नात असतात. बलाढ्य प्रायोजकांच्या दडपणामधून घडलेल्या क्रिकेट घोटाळ्यांच्या आठवणी ताज्या असताना कौ. ब. क. सारख्या मालिकांमधून जनतेची पुन्हा फसवणूक होऊ नये, म्हणून सर्वांनी दक्ष असायला हवे.

महाराष्ट्र टाइम्स
१६ नोव्हेंबर २०००



## केबल-संस्कृतीचे घातक परिणाम

केबलचालकांविरुद्ध राज्य शासनाने घेतलेल्या कडक धोरणाला सर्वसामान्य नागरिकांनी ठामपणे पाठिंबा व्यक्त केला पाहिजे. सध्याचा केबल चालवण्याचा धंदा उघडपणे गुन्हेगारी स्वरुपाचा तर आहेच, त्याशिवाय केबल टी. व्ही. च्या कार्यक्रमांमुळे घरातले परस्पर कौटुंबिक संवादसुध्दा तुटले आहेत. केबल टी.व्ही.मुळे होणारे नातेसंबंधांचे नुकसान सर्वात गंभीर आहे.

सायंकाळी सात ते रात्री दहा या वेळेत जेव्हा घरातील सर्व व्यक्ती एकत्र येत असतात. नेमक्या याच वेळेत केबलच्या कार्यक्रमांचा उच्छाद शिगेला पोहोचलेला असतो. चाकोरीबध्द आणि एकसुरी स्वरुपाच्या केबल मालिकांच्या तीव्र आवाजाच्या पातळीमुळे घराघरातील व्यक्तींच्या श्रवणशक्तीवर विपरीत परिणाम होऊ लागले आहेत. केबलचे कार्यक्रम पाहताना टी. व्ही. संचाची ध्वनिपातळी एवढी वाढवून ठेवावी लागते की, त्यामुळे कार्यक्रम चालू असताना कुटुंबातील कोणाचा एकमेकांशी संवाद होणे शक्यच नसते. त्यामुळे टी.व्ही. वरील कार्यक्रम रेडिओच्या तुलनेत कानाला खूप कर्कश वाटतात. त्यात टी.व्ही. वरच्या जाहिरातीचे आवाज तर असह्य असतात. तरीसुध्दा एकाद्या सौम्य विषाप्रमाणे केबलच्या कार्यक्रमांची चटक सर्वांना लागली आहे.

अतितीव्र आवाजात जोडीला रंगीबेरंगी हलणारी चित्रे बघण्यास भाग पाडणाऱ्या केबल टी.व्ही. मध्ये दर्शकांना संमोहित करण्याची शक्ती असते, हे आता सिध्दच झाले आहे. अशा संमोहित दर्शकांच्या जाणिवासुध्दा बोथट होण्याची शक्यता असते की, ज्याची झलक आपण प्रत्येक क्षेत्रात सध्या अनुभवत आहोत. समाजाच्या वाढत्या बकालीकरणाची जी अनेक कारणे आहेत, त्यापैकी, केबल संस्कृतीला शरण जाणे, हेसुध्दा एक कारण आहे.

टी. व्ही. ला असलेली रिमोटची सोय केबलची नशा वाढवण्यासच मदत करते, असा अनुभव आहे. केबल टी. व्ही. ची झिंग सध्या एवढी वाढली आहे की, नागरिकांनी काय बघावे, किती काळ बघावे, याचा निर्णय दर्शकांच्या हाती राहिला नसून याचा रिमोट केबलचालक, वाहिन्यांचे मालक आणि जाहिरातदारांच्या हातात आहे.

शहरातील वाहतूकदार जेव्हा संपावर जातात, तेव्हा मुंबईकरांना प्रदूषणविरहित स्वच्छ हवेचा अनुभव घेता येतो, तसाच प्रसन्न अनुभव केबल-चालकांच्या दोन दिवसांच्या संपामुळे घेता आला. दोन दिवसांच्या 'केबल बंद'च्या काळात अनेक कुटुंबांतील व्यक्तींनी एकमेकांच्या सुख-दु:खाची आणि प्रकृतीची विचारपूस केली असणार; कारण या काळात घरातील केबल टी.व्ही. नामक राक्षस शांत होता.

केबलचालकांची वाढती दादागिरी आणि केबल संस्कृतीमुळे होणारे दुष्परिणाम बघता, शासनाने केबलचालकांवर अधिकाधिक कर बसवावेत की, ज्यामुळे केबलदर्शकांना केबलवरचे मनोरंजन महागडे व्हावे.

महाराष्ट्र टाइम्स
३१ ऑगस्ट २०००



## मध्यमवर्गाचा उलटा प्रवास

आणीबाणीला २५ वर्षे झाल्याच्या निमित्ताने (कुमार केतकर व प्रकाश बाळ : 'मैफल, म.टा. २५ जून) दोन्ही लेख वाचल्यानंतर म. टा.चा वाचक असल्याचा अभिमान अधिक वाटू लागला. एकाच विषयाकडे दोन भिन्न दृष्टीकोनातून बघणे काय असते याचा अनुभव देणाऱ्या या दोन्ही लेखांमुळे समाजातील सहिष्णुतेचासुद्धा पुरावा मिळाला. दोन्ही लेखकांचं आणि संपादकांचं याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन.

आणिबाणीनंतरच्या गेल्या २५ वर्षातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर दोन्ही लेखांचा तटस्थपणे अभ्यास केल्यानंतर असा प्रश्न पडतो की, आणीबाणीविरोधी व्यक्तींनी गेल्या २५ वर्षांत लोकशाही मूल्ये समाजात रुजवण्यासाठी कोणते परिश्रम केले? तात्त्विकदृष्ट्या, आणीबाणी म्हणजे लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी, ही वस्तुस्थिती मान्य करूनसुद्धा मूलभूत मुद्दा उरतोच; तो म्हणजे, आणीबाणीनंतरच्या काळात देशातील मध्यमवर्गात लोकशाहीविषयी आदर वाढला, की कमी झाला? आणीबाणीला विरोध करण्यात आघाडीवर असलेल्या व्यक्ती ज्या मध्यमवर्गातून आल्या होत्या, तो मध्यमवर्ग आज उघडपणे लोकशाहीच्या विरुद्ध वाटचाल करताना दिसतो, याचे सर्वात ताजे उदाहरण म्हणून नुकत्याच झालेल्या विधान परिषदेच्या मुंबई शहर शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीकडे बघता येईल. ऐंशी हजार शिक्षक मतदार असलेल्या या मतदारसंघातील केवळ बारा हजार शिक्षकांनी मतदार म्हणून नोंदणी करून घेतली होती. त्यापैकी फक्त सहा हजार शिक्षकांनीच प्रत्यक्ष मतदान केले आणि सर्वात दुर्दैवी गोष्ट अशी की एकूण मतदारांपैकी तब्बल सहाशे मतपत्रिका बाद झालेल्या होत्या. मुंबईसारख्या शहरातील सुशिक्षित मध्यमवर्गीय शिक्षकांचा लोकशाही प्रक्रियेकडे बघण्याचा दृष्टिकोन या बाद झालेल्या मतपत्रिकांमधून ठळकपणे दिसतो.

लोकशाहीचा कैवार असणाऱ्या व्यक्तींनी आपल्या आजूबाजूची माणसे किती झपाट्याने लोकशाहीच्या विरुद्ध वाहात जात आहेत, याचा थोडा जरी अंदाज घेतला तर मला वाटते, गेल्या पंचवीस वर्षांचा हिशेब सहजपणे मिळू शकेल.

लोकशाही प्रणालीत देशात घडत असलेल्या कोणत्याही गोष्टींचे श्रेय अथवा अपश्रेय एखाद्या व्यक्तीकडे देणे कसे चुकीचे असते, याचे समर्थक विश्लेषण कुमार केतकरांच्या लेखामधून वाचण्यास मिळाले. आज जेव्हा देश विभाजनाच्या उंबरठ्यावर उभा आहे, अशा वेळी मागे वळून बघितल्यास असे वाटते की, इंदिरा गांधींनी जर तेव्हा आणीबाणी जाहीर केली नसती, तर कदाचित केव्हाच देशाचे तुकडे पडले असते.

**महाराष्ट्र टाइम्स**
**९ जुलै २०००**



# समाजापुढील खरे सांस्कृतिक संकट !

सरकारी मालकी असलेली आकाशवाणी आणि दूरदर्शन ही दोन्ही प्रसारमाध्यमे सध्या एका निर्णायक वळणावर उभी आहेत. सरकारच्या नवीन आर्थिक धोरणाच्या अंदाधुंद अंमलबजावणीचा फटका या दोन्ही संस्थांना बसणार असून, त्यामुळे अंतिमत: खरे नुकसान देशातील सामान्य नागरिकांचे होणार आहे.

देशातील बहुजनांची सर्वांगीण सांस्कृतिक मशागत व्हावी, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या या संस्थांचा समाजाच्या जडणघडणीत मोठा हातभार आहे. दूरदर्शनच्या तुलनेत आकाशवाणीने तर तब्बल दोन-तीन पिढ्यांची सांस्कृतिक सेवा केली आहे. सध्या सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे फक्त करमणूक प्रधान कार्यक्रम असा मर्यादित अर्थ गृहीत धरला जातो. पण आकाशवाणीने व्यापक अर्थाने गेली ७५ वर्षे रंजनाबरोबरच प्रबोधनाचेसुद्धा कार्यक्रम सादर केले आहेत.

कामगार, ग्राहक, बालक, युवक, पालक, महिला, कुटुंब, शेतकरी यासारख्या अनेक समाजगटांसाठी, त्यांच्या हिताचे कार्यक्रम केवळ आकाशवाणीवरून सादर होत असतात. आकाशवाणीवरून सादर होत असलेल्या कार्यक्रमांचे एवढे वैविध्य आहे की, त्याची तुलना केवळ इंटरनेटशीच केली जाऊ शकते. इंटरनेटसाठी संगणक, दूरध्वनीच्या जोडीला वीजसुद्धा असणे गरजेचे असते; परंतु आकाशवाणीच्या कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी यापैकी कशाचीच गरज नसते. देशाच्या कानाकोपऱ्यातील कोणतीही व्यक्ती, मग ती निरक्षर असो अथवा दृष्टिहीन, आकाशवाणीचा श्रोता असू शकते. महत्त्वाचे म्हणजे आकाशवाणीचे कार्यक्रम, आपल्या कामाच्या वेळेवर अतिक्रमण करत नाहीत.

अशा सोप्या, स्वस्त आणि प्रभावी माध्यमांची चर्चा मोठ्या शहरांमधून सध्या कमी होत असते. या परिस्थितीचा गैरफायदा चाणाक्ष खाजगी कंपन्या आणि उच्चपदस्थ नोकरशहा सध्या घेत आहेत. सरसकट खाजगीकरण करण्याच्या सरकारी निर्णयामुळे जनसामान्यांना

जवळचे असलेले आकाशवाणी हे प्रसारमाध्यम स्वत:चे अस्तित्व हरवून बसण्याची चिन्हे आहेत. एका बाजूला आकाशवाणीला जाहिरातीचे उत्पन्न मिळवून देणाऱ्या एफ. एम. वाहिन्या खाजगी कंपन्यांना विकण्यात आल्या असून, दुसऱ्या बाजूला दैनंदिन कार्यक्रम तयार करण्यासाठी आवश्यक निधी नवीन आर्थिक वर्षापासून आकाशवाणीकडे हस्तांतरित केला नसल्याचे समजते. त्यातच आता, जाहिरातींची वानवा नसलेल्या विविधभारतीचे कार्यक्रमही खाजगी निर्मात्यांकडून बनवले जाणार असून, त्यामुळे आकाशवाणीवरील कलावंत–कर्मचाऱ्यांना कामच उरणार नाही. दुहेरी आर्थिक कात्रीत सापडलेल्या आकाशवाणी कर्मचाऱ्यांचे मनोबल एवढे खालावले नाही, तरच नवल !

नियोजनशून्य बदल्यांमुळे आधीच हवालदिल झालेल्या आकाशवाणीच्या कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाशर्ती कोणत्या आहेत, याची अजिबात कल्पना नसल्यामुळे त्यांच्यावर अस्थिरतेची टांगती तलवार लटकते आहे. प्रसारभारती आणि केंद्र सरकार यापैकी आपण नेमके कोणाचे कर्मचारी आहोत, याविषयी आकाशवाणीत सर्व स्तरावर संभ्रम आहे. केंद्र सरकारमध्येही स्वत:च्या मालकीच्या अशा प्रभावी माध्यमांचे काय करायचे, याविषयी स्पष्टता नाही; कारण दोन वर्षापूर्वी स्थापन झालेल्या प्रसारभारती महामंडळाच्या संचालक मंडळावर कोणाची आणि किती जणांची नियुक्ती करायची, याविषयीचा घोळ अजून संपत नाही.

नजीकच्या भविष्यात मुंबईसारख्या शहरातून एकाच वेळी ११ खाजगी एफ.एम. रेडिओ कंपन्या सुरु होणार असून, यापैकी प्रत्येक कंपनीने १० कोटी रुपये परवाना शुल्क सरकारला दिले आहे. दरवर्षी एवढी प्रचंड रक्कम देणाऱ्या खाजगी रेडिओ कंपन्यांकडून सामाजिक हिताच्या कार्यक्रमांची अपेक्षा करणे भोळेपणाचे आहे. स्वाभाविकच अशा खाजगी कंपन्या चंगळवादी जीवनशैलीवर आधारित करमणुकीचे कार्यक्रम सादर करणार आणि त्यामुळे देशाचे सांस्कृतिक जीवन उद्ध्वस्त होणार.

समाजापुढील आगामी सांस्कृतिक संकटाशी मुकाबला करायचा असल्यास, जनसंघटनांनी लोकमताचा असा दबाव सरकारवर टाकला पाहिजे, जेणेकरून स्पर्धेत टिकण्यासाठी आकाशवाणीला सक्षम करण्याची जबाबदारी सरकारला घ्यावी लागेल.

महाराष्ट्र टाइम्स

१ जून २०००



## घरच्या म्हातारीचे काळ!



'स्वत:च्याच सवलत योजनेमुळे इंडियन एअरलाइन्स संकटात', ही बातमी (म.टा.३० नोव्हेंबर) वाचली. आपली विमानसेवा लोकप्रिय व्हावी, या हेतूने जे प्रवासी अनेक वेळा इंडियन एअरलाइन्सच्या विमानाने देशांतर्गत प्रवास करतील, त्यांच्यासाठी परदेशी प्रवासाची दोन तिकिटे मोफत देण्याची योजना इंडियन एअरलाइन्सने जाहीर केली होती. या योजनेनुसार जुलै ते सप्टेंबर या कालावधीत सुमारे १८ हजार प्रवाशांनी इंडियन एअरलाइन्सच्या विमानामधून दहापेक्षा अधिक वेळा प्रवास केला आणि आता या सर्वांनी इंडियन एअरलाइन्सकडे फुकट तिकिटांसाठी अर्ज केले आहेत.

या बातमीतील धक्का देणारी वस्तुस्थिती अशी की, या १८ हजार प्रवाशांपैकी बहुसंख्य प्रवासी सार्वजनिक उद्योगातील उच्च अधिकारी आहेत की, ज्यांना त्यांच्या नोकरीच्या निमित्ताने देशभर फिरावे लागते. मुळात सार्वजनिक उद्योगातील उच्चपदस्थांना अनेक वेळा देशात दौरे का करावे लागतात, असा सुद्धा प्रश्न आहेच. परंतु हा प्रश्न जरी बाजूला ठेवला, तरी मुद्दा उरतो, तो म्हणजे जनतेच्या पैशातून केलेल्या विमान प्रवासापायी मिळणारा फायदा, ही मंडळी व्यक्तिगत कारणांसाठी कसा काय घेऊ शकतात? आधीच तोट्यात चालणाऱ्या इंडियन एअरलाइन्सला अशा फुकट्या प्रवाशांपायी शंभर फुकट उड्डाणे करावी लागणार आहेत.

नवीन आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करणं म्हणजे कर्मचाऱ्यांची संख्या कमी करायची, गरीबांच्या सबसिड्या काढून टाकायच्या किंवा फायद्यात चालू शकणारे सार्वजनिक उद्योगधंदे खाजगी उद्योजकांना भेट म्हणून दान करुन टाकायचे, असा संकुचित अर्थ सध्या

लावला जात आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक उद्योगांच्या अधोगतीस निव्वळ कर्मचारी संघटनाच जबाबदार असल्याचा जो प्रचार हितसंबंधीयांकडून केला जातो, तो कसा चुकीचा आहे, हे या फुकट्या प्रवाशांनी सप्रमाण सिद्ध केले आहे.

आजारी सार्वजनिक उद्योगधंद्यातील उच्च अधिकाऱ्यांच्या अशा हावरेपणाची दखल केंद्रीय मंत्री मनोहर जोशी घेतील का?

महाराष्ट्र टाइम्स
७ डिसेंबर १९९९



# सामंतवाडीचे दुखणे

गोरेगाव स्थानकाच्या पूर्वेच्या बाजूला असलेली सामंतवाडी स्टेशनच्या सर्वांत जवळ असलेली रहिवाशांची आदर्श सोसायटी म्हणून ओळखली जायची. केवळ दोनच मिनिटांच्या अंतरावर असलेल्या या वसाहतीकडे जाण्यास हल्ली पाच मिनिटांहून अधिक वेळ लागत आहे.

बेसुमार वाढलेल्या वाहनांच्या संख्येमुळे सामंतवाडीत पोहोचण्यास अधिक वेळ लागतो हे एक वेळ समजू शकते. परंतु रस्त्याच्या दुतर्फा असलेले फेरीवाले, बेस्टच्या बसेसचे थांबे, अवजड वाहनांची वाहतुक यामुळे सामंतवाडीत जाणारा सोनावाला रस्ता सध्या भयंकर धोकादायक व प्रदूषणयुक्त बनला आहे. हे वास्तव मात्र सामंतवाडीतल्या रहिवाशांच्या सहनशीलतेच्या पलीकडचे आहे.

स्टेशनच्या बाहेर पडल्याबरोबर एका बाजूला रिक्षास्टँड आणि दुसऱ्या बाजूला टॅक्सीस्टँड असल्यामुळे रस्त्याच्या मधून अक्षरशः मुंगीच्या पावलांनी मार्ग काढावा लागतो. स्टेशनच्या समोरच असलेल्या अत्यंत धोकादायक वळणावर जेव्हा एखादी दुमजली बस वळण घेत असते तेव्हा तो क्षण बसप्रवाशांपासून पादचाऱ्यांपर्यंत प्रत्येकासाठी श्वास रोखून धरणारा असतो. असे असंख्य धोकादायक क्षण त्यापुढील प्रत्येक पावलागणिक सामंतवाडीत जाणाऱ्या प्रत्येक पादचाऱ्याला हल्ली सहन करावे लागत आहेत.

रस्त्याच्या कडेने चालायचे म्हटले तर फेरीवाले, सरबतवाले, नारळवाले, फळविक्रेते आणि त्यांच्या गिऱ्हाईकांच्या गर्दीला तोंड द्यावे लागत आहे आणि रस्त्याच्या मधून चालायचे ठरविले तर प्राणाशी गाठ असते. जीव मुठीत धरुन पोस्टाची इमारत पार केल्यानंतर जयप्रकाश हॉटेलसमोरच्या पिंपळाच्या झाडाभोवती बांधलेला संगमरवरी पार आडवा येतो. या पाराच्या

समोरच्या बाजूला तीन रस्ते एकत्र आले आहेत की ज्या ठिकाणी वाहतुकीची कोंडी नेहमी झालेली असते. अशा वेळी पादचाऱ्यांना चालण्यासाठी इंचभरसुद्धा जागा उरत नाही. सोनावाला रस्त्याच्या सुरुवातीलाच 'लीलाज्' नावाचे मोठे हॉटेल आहे. त्या हॉटेलमध्ये वर्षभर सतत काही ना काही निमित्ताने समारंभ होतच असतात. या समारंभासाठी आलेले पाहुणे आणि पाहुण्यांच्या गाड्या यामुळे अर्धा रस्ता नेहमी व्यापलेला असतो आणि बरोबर त्याच्या समोरच्या बाजूला वडापाव आणि गुलाबजामच्या गाड्यांवर अहोरात्र खाद्यजत्रा चालू असते. दोन पावले पुढे गेल्यानंतर लगेच सम्राट मोटर स्कूलची वाहने रस्त्याच्या कडेला उभी करुन ठेवलेली असतात. या वाहनांचा अडथळा पार केल्यानंतर लगेच किमान दहा विविध मार्गांवरचे असंख्य प्रवासी गर्दी करुन उभे असतात. अशा प्रकारच्या कोंडीमधून वाट काढत सामंतवाडीतील खाजगी रस्त्यावर मोकळा श्वास घ्यावा, म्हटले तर तिथे तर धक्कादायक दृश्य नजरेस पडत असते. सध्या या खाजगी रस्त्यावर अनेक आगंतुक आणि प्रवासी कंपन्या त्यांची वाहने उभी करुन निघून जात असतात. या उभ्या केलेल्या वाहनांच्या आडोशाचा फायदा व्यसनी कंपनी गर्द ओढण्यासाठी करुन घेतात. त्यामुळे सामंतवाडीचा परिसर सध्या दिवसेंदिवस भीषण बनत आहे. याविरुद्ध कृती होईल काय?

लोकसत्ता
१२ नोव्हेंबर १९९९



# केवळ गांधी-कुटुंबाचीच आजवर संघपरिवाराच्या विरोधात लढाई

अतुल भातखळकर याचा भन्नाट शोधक लेख (म.टा. २८ एप्रिल) वाचून करमणूक झाली. आगामी निवडणुकींसाठी भाजपचा प्रचाराचा आराखडा कसा असेल, याची अंधुक कल्पनासुद्धा प्रस्तुत लेखामुळे आली. रामजन्मभूमी प्रकरणापासून भाजप, इतिहासाची मोडतोड करण्याच्या विद्येत पारंगत असल्याचा अनुभव भारतीयांपाशी असल्यामुळे, प्रस्तुत लेखातील निष्कर्षांशी नागरिक सहमत होणार नाहीत आणि त्यातून गेल्या १३ महिन्यांतील घडामोडी भारतीयांनी सुज्ञपणे अनुभवल्यामुळे भातखळकरांना अपेक्षित कौल यावेळी मतदार देतीलच असे आज तरी वाटत नाही.

आजही सर्वसामान्यांना, तेरा महिन्यांपूर्वी भाजप पुढाऱ्यांनी जयललितांची मनधरणी व लांगूलचालन कसे केले होते, याची आठवण आहे. याच जयललिताबाईंनी, त्यांना दिलेल्या वाचनांची पूर्तता न झाल्यामुळे वाजपेयी सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि त्यामुळेच खरे म्हणजे देशाला मध्यावधी निवडणुकींना सामोरे जावे लागत आहे. त्रिशंकू लोकसभेत सत्तेच्या लालसेपायी जयललितांना भरमसाठ आश्वासने दिली होती. याच साहसापायी पुढील वर्षभर, जयललिता आणि भाजप यांच्यामधील उंदीर-मांजरांचा खेळ साऱ्या देशाने डोळे उघडे ठेवून पाहिला. जयललिताबाईंच्या हाती, वाजपेयी सरकारच्या प्राणवायूची नळी होती, हे साऱ्या देशाला नक्की माहिती असतानासुद्धा भाजपचे पुढारी स्थिरतेच्या वल्गना करत होते. अशा परिस्थितीत कुमारमंगलम आदि मंडळींनी जयललिताबाईंना धमकावण्याचा जो प्रयत्न केला तो अंगाशी आला आणि त्यामुळे वाजपेयी सरकारला विश्वासदर्शक ठराव मांडावा लागला.

एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, वाजपेयी सरकारने स्वत:हून संसदेत विश्वासमतदर्शक ठराव आणला होता. म्हणजे विश्वास सिद्ध करण्याची जबाबदारी वाजपेयी सरकारची होती, ज्यामध्ये सरकारला अपयश आले. पर्यायी सरकार स्थापन करून दाखवण्याची जबाबदारी विरोधी पक्षावर येतच नव्हती कारण त्यांनी अविश्वास ठराव मांडलाच नव्हता. अशा वेळी निवडणुका घेणे हाच खरा योग्य पर्याय होता. परंतु गेले वर्षभर कॉंग्रेस पक्षाकडून असे सतत सांगण्यात येत होते की, वाजपेयी सरकार त्यांच्या अंतर्गत ओझ्याखाली गडगडले, तर संभाव्य घटनात्मक पेचप्रसंगात, कॉंग्रेस पक्ष जबाबदारीने वागेल. त्याप्रमाणे सोनिया गांधींनी अतिशय समंजसपणे-पर्यायी सरकार बनवण्याचा प्रयत्न केला; परंतु सत्ताप्राप्तीसाठी तत्त्वशून्य आघाडी बनवण्यास नकार दिल्यामुळेच अंतिमत: राष्ट्रपतींचा निर्णय मान्य केला.

या उलट एकदा विश्वासमतदर्शक ठराव हरल्यानंतरसुद्धा पुन्हा आपल्यालाच सरकार बनवू द्यावे, अशी मागणी करणारे पुढारी निव्वळ सत्तालोलुप असल्याचे सिद्ध झाले. येनकेन प्रकारे सत्ता हस्तगत करण्याची घाई भाजपच्या पुढाऱ्यांना एवढी झाली आहे की, काही दिवसांपूर्वीचे मुल्ला मुलायमसिंगसुद्धा ते आपल्या कळपात ओढू पहात आहेत. गेल्या काही वर्षात भाजप आणि इतर पक्षांतल्या पुढाऱ्यांनी ज्या आश्चर्यकारक साहसी कोलांट्या उड्या मारल्या आहेत, ते बघून अशी शंका येते की, अंतिमत: केवळ गांधी कुटुंबाविरुद्ध देशातील सर्व इतर राजकीय पुढारी अशीच लढाई होणार आहे. केवळ सोनिया गांधी वगळता आज जे कोणी कॉंग्रेस पुढारी आहेत, ते सुद्धा उद्या भाजपच्या कळपात सामील होणारच नाहीत, असे सांगता येत नाही. कारण सध्याच्या अतिलवचिक राजकीय विचारप्रणालीमध्ये गांधी कुटुंबीयच केवळ संघ परिवाराच्या विरोधात उभे राहिले असल्याचे दिसते. बाकी इतर सर्व पुढाऱ्यांनी कधी ना कधी साहसवादाचे प्रदर्शन केले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
१७ मे १९९९



# डोंबिवलीतील अभिनव गुढीपाडवा

गुढीपाडव्याचा सण डोंबिवलीमधल्या नागरिकांनी अभिनव स्वरुपात, सार्वजनिकपणे साजरा केला. हिंदू नववर्षाचे स्वागत जल्लोषात करण्याच्या या घटनेच स्वागत त्याचवेळी होऊ शकेल की जेव्हा डोंबिवलीमध्ये बहुसंख्य लोक येणाऱ्या ३१ डिसेंबरच्या रात्री नेहमीप्रमाणेच आपापल्या घरीच राहतील.

लोकांची उत्सवप्रियता ऐवढी टोकाला गेली आहे की त्यामुळे शंका अशी वाटते की, यापुढे लोक गुढीपाडव्याचा दिवस शोभायात्रेत घालवतील आणि त्याच्याच जोडीला ३१ डिसेंबरची रात्रसुध्दा चैनीत साजरी करतील.

नव वर्ष साजरे करण्याची अशी दुहेरी प्रथा जर यानिमित्ताने सुरु होणार असेल तर त्यापेक्षा सध्याचा ३१ डिसेंबरचा धांगडधिंगाणा परवडला अस म्हणायची पाळी येईल.

सध्या सुरु असलेल्या कुठल्याही अनिष्ट प्रथेला पर्याय म्हणून तेवढीच दुसरी अनिष्ट प्रथेचा पायंडा पाडण्याऐवजी, एकूण समाजाचे हित नेमक कशात आहे याची सखोल चर्चा घडण जास्त जरूरीच आहे.

सध्याच सार्वजनिक गणेशोत्सवाच स्वरूप समाजाला न परवडणार होत आहे अशा वेळी गुढीपाडव्याचा सण सार्वजनिक स्वरूपात साजरा करून आपण काय साध्य करणार यावर विचारमंथन् झाला पाहिजे. पारंपारिक सण, सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्यामध्ये, समाजाची शक्ती एकवटण्याऐवजी राष्ट्रीय, सणामध्ये समाजातील प्रत्येकाला सामावून कस घेता येईल याकडे अधिक लक्ष देण्याची गरज सध्या आहे. सध्या १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दोन्ही दिवशी आपल्याकडे जे सुतकी वातावरण असतं ते अधिक गंभीर आहे, तेव्हा राष्ट्रीय सणांकडे लोकांच लक्ष केंद्रीत करण्यासाठी काय करता येईल हे बघितल पाहिजे.

नवशक्ति
२५ मार्च १९९९

# विपश्यनेवरचा लेख आवडला

सत्याग्रही दिवाळी अंकातील विपश्यनेवरचा लेख मनापासून आवडला. अतिशय प्रभावी शब्दात आणि शैलीतील तुमचा हा लेख खूप महत्वाचा आहे. मी लवकरच शिबिरात सहभागी होणारच आहे. म्हणून माझ्यासारख्याला तर हा लेख मार्गदर्शन मित्रासारखा उपयोगी पडणार आहे. तसेच जे वाचक अजून विपश्यनेबद्दल विचारसुद्धा करत नाहीत त्यांनासुद्धा या संबंध प्रक्रियेचा विचार करण्यास भाग पाडणारा आहे.

सत्याग्रही विचारधारा

मार्च १९९९



# प्रत्येकाने स्वातंत्र्य दिन साजरा करावा

गेल्या वर्षीच्या १४ ऑगस्टच्या मध्यरात्री आम्ही काही कार्यकर्ते मित्रमंडळी सहपरिवार चव्हाण सेंटर इथे एका कार्यक्रमानिमित्त एकत्र झालो होतो. ठीक रात्री १२ वाजता त्या ठिकाणी सामूहिक राष्ट्रगीत गायनाचा कार्यक्रम झाल्यानंतर आम्ही सर्व जण मुंबईतील महत्त्वाच्या स्थळांना भेटी देण्यासाठी बाहेर पडलो. यामध्ये गेटवे ऑफ इंडियापासून सुरुवात केली आणि हुतात्मा चौक, मणिभवन, ऑगस्ट क्रांती मैदान, भेंडीबाजार, शिवाजी पार्क, नेहरू सेंटर अशी ठिकाणं करत शेवटी चैत्यभूमीवर जाऊन आम्ही आमच्या भटकंतीचा शेवट केला. या प्रत्येक ठिकाणी आम्ही राष्ट्रगीताबरोबर राज्यघटनेच्या सरनाम्याची सामूहिक शपथसुद्धा घेतली. विशेष म्हणजे अशी शपथ घेण्याअगोदर आमच्या ग्रुपमधल्या प्रत्येक व्यक्तीने देशासंबंधीच्या आपल्या अपेक्षा आणि स्वत:ची कर्तव्यं याबाबतीतले आपले विचार मोकळेपणाने सर्वांसमोर मांडले. आमच्या भटकंतीमध्ये एक गोष्ट आम्हाला ठळकपणे जाणवली, ती म्हणजे भेंडीबाजार वगळता अन्य सर्व ठिकाणी १४ ऑगस्टच्या रात्री शुकशुंकाट होता. भेंडीबाजारामध्ये मात्र रात्री दोन वाजता आमच्याबरोबर राष्ट्रगीत म्हणण्यासाठी स्थानिक नागरिकसुद्धा मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

उत्स्फूर्तपणे घडलेल्या या भटकंतीचा फायदा असा झाला की, पुढील वर्षभरात आमच्या ग्रुपमधल्या प्रत्येक व्यक्तींचा देशाकडे बघण्याचा दृष्टीकोन अधिक सकारात्मक झाला.

एरवी ३१ डिसेंबरच्या रात्री किंवा नवरात्री उत्सवानिमित्ताने सामान्य मुंबईकर प्रचंड उत्साहात जागरण करण्यास तयार असतात तोच उत्साह जर १४ ऑगस्टच्या रात्री आपापल्या श्रद्धास्थळांना भेटी देण्यासाठी वापरला तर राष्ट्रीय सण साजरा करण्याची परंपरा आपण जिवंत ठेवू शकू असा मला विश्वास वाटतो.

आपलं महानगर

१२ ऑगस्ट १९९८

# पूर्वग्रहदूषित भूमिका

मंगळवार, १० फेब्रुवारीच्या अंकातील राजेंद्र साठे यांचा 'सोनिया आमच्या इतिहासातील एक शंकास्पद पात्र' हा लेख वाचला. त्यांची भूमिका पूर्वग्रहदूषित आणि संकुचित वृत्तीची वाटली. प्रस्तुत लेखाच्या शीर्षकातूनच लेखकाचा जगाकडे बघण्याचा संकुचित दृष्टिकोन स्पष्ट होतो. शीर्षकातील 'आमच्या इतिहासातील' हे शब्दच मुळी 'गर्व से कहो' च्या भूमिकेशी मिळतेजुळते वाटतात.

इतिहासासारख्या वैश्विक विषयामध्येसुद्धा जर लेखक आमचा इतिहास-तुमचा इतिहास असा भेदभाव करणार असेल तर अशा मनोवृत्तीच्या लोकांना सोनिया गांधींबद्दल शंका वाटणं साहजिकच आहे.

गांधी-नेहरु घराण्यातील व्यक्तींच्या प्रभावाचं कोडं जाणून घेण्यासाठी पुस्तकी पांडित्यांची गरज नसून त्यासाठी संपूर्ण भारतभ्रमण करुन भारतीयांची नस पकडण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. गांधी-नेहरु कुटुंबियातील व्यक्तींविषयी छुपेपणाने शंका व्यक्त करण्याअगोदर लेखकाने भारतीयांच्या भावविश्वाचं नीटपणे आकलन करून घेतलं असतं, तर लेखकाची वैचारिक फसगत झाली नसती. लेखकाच्या झालेल्या वैचारिक फसगतीमुळेच गांधी-नेहरु कुटुंबियांची तुलना लेखक ठाकरे कुटुंबियांबरोबर करु पाहत आहे.

इतिहासातील घटनांपासून बोध न घेता आपण अजूनही जुन्याच पद्धतीने गांधी-नेहरू कुटुंबाचा आंधळेपणाने द्वेष करत राहिलो तर पुन्हा एकदा एका गांधीला शहीद झालेलं आपल्याला पाहावं लागेल.

आपलं महानगर

१७ फेब्रुवारी १९९८



# थोर व्यक्तिमत्त्वांच्या टवाळीत धन्यता मानणाऱ्यांना चपराक

'शांतिदूत' या अग्रलेखाद्वारे (म.टा. ८ सप्टेंबर) आपण समाजातील संकुचित मनोवृत्तीवर नेमके बोट ठेवले आहे. गेल्या काही वर्षांपासून समाजातील काही व्यक्ती, त्यांचे राहणीमान जागतिक दर्जाचे ठेवण्यासाठी धडपडताना दिसतात. परंतु त्याच वेळी अशा व्यक्ती कोत्या आणि अपरिपक्व विचारांचे प्रदर्शन करताना दिसतात, समाजातील ही विसंगतीसुद्धा या अग्रलेखामुळे उघड झाली.

जागतिक पातळीवरचा विचार करावा आणि स्थानिक पातळीवरची कृती करावी, अशी एक म्हण प्रचलीत आहे. या म्हणीच्या बरोबर उलटा व्यवहार करणाऱ्या व्यक्तींकडूनच मदर तेरेसांसारख्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वांबद्दल शंका घेतली जात आहे. कुठल्याही जागतिक दर्जाच्या व्यक्तिमत्त्वांची चेष्टा करून किंवा त्यांच्या मोठेपणाबद्दल शंका व्यक्त केल्यामुळे त्या थोर व्यक्तिमत्वांच्या मोठेपणामध्ये काहीच फरक पडत नसतो. परंतु ज्या व्यक्ती अशा शंका उपस्थित करतात, त्यांचे मात्र अशा वृत्तीमुळे नुकसान होत असते;

संकुचित वृत्तींच्या व्यक्तींचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अशी माणसे एकतर भूतकाळात रममाण होत असतात, नाहीतर एकदम भविष्यकाळात जगत असतात. आजुबाजूच्या वर्तमानातील व्यक्तींशी, घटनांशी काही नाते जोडून घेतच नाहीत. त्यामुळे वर्तमानकाळातील उत्तुंग व्यक्तिमत्त्व, त्यांना आदर्श म्हणून ठेवताच येत नाही. काही ना काही वैगुण्यावर बोट ठेवून आयुष्यभर थोर व्यक्तिमत्त्वांची टवाळकी करण्यातच धन्यता मानणारी माणसे, स्वत:बरोबरच, एकूण समाजाचेही नुकसान करत असतात.

समाजातील संकुचित वृत्तीला खतपाणी घालण्याचे काम जातीयवादी पुढाऱ्यांनी त्यांच्या स्वार्थासाठी केले आहे. या पुढाऱ्यांनी वैश्विक शाश्वत मूल्यांची व्याख्याच बदलून टाकली आणि विशाल उदारमतवाद हास्यास्पद बनवला. जातीयवादाच्या या कारस्थानामुळे समाजाचे खच्चीकरण होत असते, हे सर्वांनी या निमित्ताने लक्षांत ठेवले पाहिजे.

महाराष्ट्र टाइम्स
२४ सप्टेंबर १९९७



## 'मार्केटिंग' म्हटल्याने काय बिघडते?

दि. २ मार्चच्या 'वृत्तमानस' मधील श्री. हेमंत कर्णिक यांचा लेख वाचून एक गोष्ट ठळकपणे जाणवली की, श्री. कर्णिक यांनी श्री. कुमार केतकर यांचा 'मार्केटिंग' हा शब्द फारच मनाला लावून घेतला आहे. गंमत म्हणजे 'मार्केटिंग' या शब्दाबाबत तीव्र आक्षेप घेणारे कर्णिक लेखाच्या शेवटी शेवटी त्याच विचारावर आलेले दिसले ! उच्च कला किंवा जीवनविषयक मूल्यांचेसुद्धा मार्केटिंग करावेच लागते. त्यातून मार्केटिंग हा शब्द रूचत नसल्यास मार्केटिंगऐवजी 'प्रबोधन' म्हणावे.

प्रस्तुत लेखात वरकरणी केतकरांचा युक्तिवाद खोडून काढणारी सर्व विधाने अखेर केतकरांचा युक्तिवादच पटवून जातात. सध्याच्या जगात ज्याप्रमाणे संगणकाचा वापर सर्वस्पर्शी आहे, त्याचप्रमाणे मार्केटिंग तंत्राचा वापर प्रत्येक ठिकाणी अनिवार्य बनला आहे. केवळ आजच्या जगातच नव्हे, तर इतिहासातील प्रत्येक कालखंडातील युगपुरुषाने मार्केटिंगचे बारकावे आत्मसात केलेले दिसतात. त्या त्या काळानुसार त्या वेळी शब्द वेगळे वापरले गेले.

'मार्केटिंग' शब्दाचा एवढा बाऊ न करता या तंत्रातील आपल्याला पटेल, रुचेल, पचेल तेवढा भाग स्वीकारून प्रत्येकाने आपापले उद्दिष्ट गाठावे, त्यात काहीच गैर नाही. मार्केटिंग आणि प्रबोधन हे दोन्ही शब्द गुळगुळीत वाटले, तर आणखी एक पर्यायी शब्द वापरता येईल. 'एनरोलमेंट' (Enrollment) ! हा शब्द 'मार्केटिंग' या शब्दातील बाजारूपणा दूर करणारा आहेच. शिवाय त्याच कृतीला मानवी स्पर्श देणारासुद्धा आहे.

माझ्या मते, सध्या श्री. केतकरांसारख्या व्यक्ती ज्या वेळी समाजाच्या वाढत्या बकालीविरिद्ध लढत आहेत, त्या वेळी त्यांचा हेतुविषयी शंका घेऊन आपण सर्वांचे नुकसान तर करीत नाही ना, याचा प्रत्येकाने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

वृत्तमानस
९ मार्च १९९७



# परखड परिसंवाद

'महानगर'ने आपल्या सातव्या वर्धापनदिनानिमित्ताने आयोजित केलेला परिसंवाद, अनेक विचारांना चालना देणारा ठरला.

त्या दिवशीच्या परिसंवादातून पुष्पाताई भावे आणि कुमार केतकरांनी धैर्य दाखवून मराठी मध्यमवर्गाची दांभिकता, आशाळभूतपणा, मिजास आणि अगतिकपणाची परखड चिकित्सा केली. तिची फार जरुरी होती. फॅसिस्ट वृत्तीच्या लोकांनी पद्धतशीरपणे समाजमनाचं बकालीकरण घडवून आणलं. त्यामुळे निर्माण झालेला अभिरूचीशून्य समाज, आज निमूटपणे युती सरकारचे अपराध सहन करतो आहे हे वास्तव पुष्पाताईंनी स्पष्ट केल्याबद्दल त्यांचे आभार.

आधी ठरवूनसुद्धा गोपीनाथ मुंडे या परिसंवादास अनुपस्थितीत राहिले आणि जॉर्ज फर्नांडिस यांनी अध्यक्षीय भाषणानंतर भाषण केलं या दोन्ही गोष्टी या दोघांच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणाऱ्या होत्या.

या परिसंवादामुळे भावे, केतकरसारख्या विचारवंतांची जबाबदारी आणखी वाढली आहे, कारण त्या दिवशी त्यांनी सध्याच्या समाजाचं नेमकं कोणतं दुखणं आहे ते अचूकपणे दाखवलं. परंतु भावी पिढीने या विचारवंतांचे ऋण मान्य करावं असं जर वाटत असेल तर त्यांनी समाजाला या दुखण्यातून बरं कसं व्हायचं याचंही मार्गदर्शन करणं आवश्यक आहे.

परिसंवादाचं आयोजन करण्याविषयीच्या उपयुक्ततेची शंका वाटण्याच्या या काळात 'महानगर'च्या या परिसंवादातून जे प्रबोधन कार्य घडून गेलं, त्यामुळे पुन्हा एकदा परिसंवाद आयोजित करण्यावर विश्वास वाढला.

'महानगर'च्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा !

आपलं महानगर
२९ जानेवारी १९९७

## मालवणी भाषा म्हणजे फक्त शिव्या नव्हेत !

सावंतवाडी येथील कोमसापच्या सम्मेलनातील, नाट्यनिर्माता श्री. मच्छिंद्र कांबळी यांचे नाट्यमय आणि उत्तेजक स्वरातील भाषण ऐकून उपस्थित श्रोत्यांची घोर निराशा झाली. कोकणात भविष्यात दंगली होऊ शकतील की काय, अशी शंका श्रोत्यांना 'कांबळीं'च्या भाषणाच्या शेवटी येऊ लागली होती. प्रत्यक्षात श्रोते या अपेक्षेने बसले होते की, मालवणी भाषेच्या प्रसारासाठी काही अभिनय योजना मच्छिंद्र कांबळी सुचवतील परंतु त्याऐवजी प्रेक्षकांना परप्रातीयांच्या झोपड्या जाळण्याच्या आणि मालवणी नाटकातील भरमसाट शिव्यांच्या समर्थनाच्या गोष्टी ऐकाव्या लागल्या. सर्वात दुर्दैवाची गोष्ट अशी की. झोपड्या जाळण्याची भाषा करणाऱ्या आणि उठता बसता शिव्या देणाऱ्या कांबळींनी आपल्या भाषणात, त्यांच्यावर बॅ. नाथ पैं चा प्रभाव असल्याचे सांगितले.

श्री. मच्छिंद्र कांबळी यांना 'कोकण'ची मुंबई होऊ नये, असे खरोखरच वाटत असेल, तर त्यांनी कोकणी माणसांना त्यांच्या जमिनी न विकण्याचे आवाहन केले पाहिजे, परंतु कोकणच्या विकासाची स्वप्ने पाहणाऱ्यांनी एक जमिनीचा तुकडा, अनेक खरेदीदारांना एकाच वेळी विकण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यामुळे कोकणाची लवकर केवळ मुंबईच नव्हे तर डोंबिवली सुद्धा होणार आहे. कांबळींच्या नाटकातून भरमसाट शिव्यांचा वापर जसा केला जातो, तेवढा वापर सर्वसामान्य मालवणी कुटुंबात केला जात नाही. अतिपरिचयानंतर किंवा नातेसंबंधाना घरगुती स्वरुप आल्यानंतरच मालवणी माणूस शिव्या देऊन एकमेकांना संबोधतो. एरव्ही शिव्याविषयींची घृणेची भावना मालवणी कुटुंबात तेवढीच आहे, जेवढी इतर भाषिक कुटुंबात असते. श्री. मच्छिंद्र कांबळींनी समजून घेतले पाहिजे की, त्यांच्या नाटकांमुळे इतर भाषिकांमध्ये असे चुकीचे समीकरण रूढ होत आहे की, मालवणी भाषा म्हणजे शिव्यांची भाषा, अशा प्रकारच्या गैरसमजामुळे मालवणी भाषेचा विकास होणे अशक्य आहे.

महाराष्ट्र टाइम्स
२ जानेवारी १९९७



## Rush for cold drinks and gifts at AGMs

With September having come to a close, I am sure many corporate executives, especially company secretaries, will heave a sigh of relief because the two-month long festive season of annual general meetings (AGMs) has also ended.

Thousands of AGMs were held in large halls, and the proceedings were generally entertaining and ritualistic, rather than being major annual exercises of public inspection of the corporates finances and policies as envisaged by law.

The AGMs seem to have lost their profound objectives. In fact, now the season of AGMs only signifies a boomtime for printers, caterers, hall owners and above all for a jolly good band of retired men, old brokers, investors, and some professional speakers.

This year, I witnessed a new category of citizens - a large number of women - adding colour and festivity to these AGMs. The mundane corporate affairs sought to be questioned by obsessive brokers and shareholders occupying the front benches and explained by the directors seated on the dais were not for our worthy ladies. Their prime concern appeared to be more immediate and down to earth.

Unmindful of the proceedngs in the hall, the ladies, armed with plastic cans and thermos flasks, invariably made a beeline to the catering counters in the corridors. Most of these possessed several proxis which enabled them to collect as many cold drink coupons. Lo and behold, the way they crowd the catering counters and collecting their quota of cold drinks and emptying them into the cans and flasks.

It may be interesting to explore how these women managed to collect so many proxis and also to do the regular rounds to all AGMs everyday. In recent times, I also witnessed the horrifying scene of some them drinking as many as four or five bottles of cold drinks one after another! Their behaviour, to say the least, is aghasting, though understandably human.

The companies would do well to discontinue the practice of entertaining this indecorous and greedy class of society, who may not even be their shareholders.

The Economic Times Mumbai

2 October 1996



# असूयेचे शिकार

राज्यातील निवासी डॉक्टरांच्या बेमुदत संपाला आता आमरण उपोषणाची जोड मिळाल्यामुळे परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. निवासी डॉक्टरांच्या न्याय्य मागण्या सरकार उपेक्षेने हाताळत आहे. ही वस्तुस्थिती सरकारच्या गोरगरीबांच्या आरोग्याबाबतीतील दृष्टिकोन स्पष्ट करते. या संपाच्या कोंडीमुळे अनेक भयानक संसर्गजन्य रोग फैलावण्याची शक्यता असून, त्यामुळे सर्व समाजाचेच आरोग्य पुढील काही महिन्यांत धोक्यात येणार आहे. सामान्य नागरिक, निवासी शिकाऊ डॉक्टरांच्या मागण्यांबाबत उदासिन आहेत, त्यामागे माझ्या मते पुढील कारणे आहेत - सर्वात महत्वाचे कारण म्हणजे आरोग्य ही संकल्पना समाजाच्या पचनी पडलेली नाही. तसेच व्यावसायिक डॉक्टरांच्या मिळकतीचे आकडे प्रसिद्ध होत असतात. त्यातून जी असूया निर्माण होते, त्याचेच हे शिकाऊ डॉक्टर, शिकार झाले आहेत. या संपाची दखल समाज गंभीरपणे घेत नसल्यामागे आणखी एक कारण आहे, ते म्हणजे, शिकाऊ डॉक्टरांच्या या संघटनेला उपद्रवक्षमता नाही. कोणत्याही राजकीय झेंड्याखाली हे डॉक्टर आपल्या मागण्यांसाठी झगडत नाहीत. एकूण समाजाच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून सरकार, समाज आणि संपकरी डॉक्टर यांनी ही संपाची कोंडी फोडली पाहिजे.

महाराष्ट्र टाइम्स,

२ जानेवारी १९९६

## मतदारांना 'मामा' बनविण्याची चाल

वादग्रस्त दाभोळ वीज प्रकल्पाच्या फेरआगमताबाबत युतीचे नेते आणि संघ-परिवार यांच्यामधील सध्याच्या बोलण्यांच्या बातम्या वाचून भरपूर करमणूक होत आहेच, पण त्याचबरोबर संतापही होतो. सत्ता हस्तगत केल्यानंतर एन्रॉन प्रकरणी, युतीच्या नेत्यांना यशस्वी घुमजाव करण्यासाठी जी तारेवरची कसरत करावी लागत आहे, ती पाहून करमणूक होते, परंतु सत्तेच्या हव्यासापायी या मंडळींनी सामान्य नागरिकांना 'मामा' बनवल्यामुळे संताप येतो.

बोफोर्स बाबरी मशीद किंवा दाऊदशी संबंध यासारख्या प्रकरणीसुद्धा संघ परिवाराने विषारी प्रचारतंत्राचा अवलंब करुन भाजपला सत्ता मिळवून दिली, परंतु सत्तेत आल्यानंतर त्यांनी त्या प्रकरणातील कथित दोषी व्यक्तींना कधी उजेडात आणले नाहो. संघ परिवाराच्या अतिरेकी प्रचारतंत्राची किंमत मात्र सामान्यांना दंगलीच्या रूपात चुकती करावी लागली. एन्रॉन प्रकरणीही संघीय मंडळींनी सत्ता पदरात पाडून घेतली व यानंतर एन्रॉनलाच कंत्राट देऊन युतीचे नेते पुन्हा एकदा, बिनमहत्त्वाच्या मुद्यावर लोकांना नादी लावण्यासाठी मोकळे होतील. ज्या दिवशी एन्रॉनला 'पारदर्शीपणे' पुन्हा कंत्राट बहाल करण्यात येईल, त्या दिवशी आपल्या देशातील तथाकथित पुरोगामी विचारवंत राजकीय आत्महत्या करण्याची शक्यता आहे.

या विचारवंतांनी संघ परिवाराच्या एन्रॉन विरोधाला नैतिक पाठबळ दिले होते. पण युतीच्या नेत्यांप्रमाणे त्यांना घुमजाव करणे अशक्य आहे. बोफोर्स, बाबरी मशीद किंवा एन्रॉन यासारख्या प्रकरणांतून सामान्य जनतेचे धडा घेण्याची वेळ आली आहे. नागरिक म्हणून आपले हित नेमके कशात आहे आणि राजकारणी मंडळी त्यांची स्वतःची पोळी कशी भाजून घेतात, याचा विचार करण्याची गरज आहे.

महाराष्ट्र टाइम्स
२२ नोव्हेंबर १९९५



## शहरी स्त्रियांचा निरुत्साह खटकणारा

महाराष्ट्र महिला परिषदेच्या वतीने दिनांक १६ ऑक्टोबर रोजी 'महिला धोरणाच्या' त्वरित अंमलबजावणीच्या मागणीसाठी एक भव्य मोर्चा आयोजित केला होता. या मोर्चामध्ये सहभागी बहुसंख्य महिला कष्टकरी आणि ग्रामीण विभागातील होत्या. त्यांच्या मूलभूत गरजांसाठीचा झगडा अजून संपला नसल्याचे स्पष्ट जाणवत होते. असे असूनही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या या महिला मोठ्या उत्साहाने 'महिला धोरणां'चा पुरस्कार करत असताना दिसत होत्या.

या पार्श्वभूमीवर मुंबईतील सुशिक्षित आणि सधन महिलांची या मोर्च्याच्या ठिकाणाची अनुपस्थिती खटकत होती. प्रत्यक्षात महिला धोरणामधील अनेक तरतुदींमुळे महिलांचा आत्मसन्मान वाढणार असून त्यांची गरज ग्रामीण आणि शहरी स्त्रियांना सारख्याच प्रमाणात आहे. तरी शहरी महिलांनी 'महिला धोरण' गंभीरपणे घेतले नसल्याचे जाणवते. या परिस्थितीला कदाचित शहरी प्रसार माध्यमांचा निरुत्साह, शहरात कार्यरत असणाऱ्या कार्यकर्त्यांचा गाफीलपणा किंवा राजकीय कावीळ कारणीभूत असण्याची शक्यता आहे. कारणे काहीही असली तरी महिला धोरणांच्या अंमलबजावणीसाठी शहरी महिला कमी पडत असल्याची परिस्थिती एकूण महिला चळवळीला आशादायक नाही.

महाराष्ट्र टाइम्स
३० ऑक्टोबर १९९५

# रायगड किल्लाची चौपाटी होणार नाही याची काळजी घ्या

रायगड किल्लावर जाण्याचा योग नुकताच आला. माझी रायगडावर जाण्याची पहिलीच वेळ असल्यामुळे मी रायगडाच्या अतिभव्य दर्शनाने भारावून गेलो. महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी रायगडावर जाणे आवश्यकच आहे, असा हा महत्त्वाचा किल्ला भविष्यात सुरक्षित राहिल, याविषयी मात्र शंका वाटते.

किमान दर्जाच्या सुविधांच्या अभावामुळे किल्ले रायगड भविष्यात बकाल होईल अशी भीती वाटते. रायगडाच्या देखभालीसाठी असलेल्या कर्मचाऱ्यांचे महिन्याचे अल्प मानधनदेखील त्यांना अनेक महिने न मिळाल्यामुळे हे कर्मचारी देखभालीबाबत उदासीन आहेत. गडावर येणारे तरुण प्रवासी कधी कधी सभ्यतेच्या मर्यादा सोडताना दिसतात. अशा गोष्टींना वेळीच आवर घातला गेला नाही तर रायगडाची गिरगाव चौपाटी होण्यास वेळ लागणार नाही. रायगडावर येणारी प्रत्येक व्यक्ती भारावून जातेच पण दुर्दैवाने त्यातले फारच थोडे या किल्ल्याच्या पावित्र्यांची आणि भवितव्याविषयी काळजी करताना दिसतात. रायगडाशी अनेक गट संघटना भावनेने तसेच प्रत्यक्ष कृतीने बांधलेले आहेत. यामध्ये एका संघटनेतर्फे दरदिवशी रायगडावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास हार अर्पण केला जातो. दुसऱ्या एका संघटनेतर्फे रायगड प्रदक्षिणेचा उपक्रम राबवला जातो. सध्याचे मंत्री साबीर शेखसुद्धा गेली अनेक वर्षे न चुकता रायगडावर जात असतात, अशा सर्व व्यक्ती-संघटनांच्या एकत्रित प्रयत्नातून रायगडावरील सुविधा सुधारण्याची गरज आहे.

**सांज लोकसत्ता**

**१८ सप्टेंबर १९९५**



# जनतेच्या कल्याणाचा खेळखंडोबा

दाभोळ वीज प्रकल्प रद्द करून भाजपा-संघ परिवाराने आपल्या विध्वंसक वृत्तीचा पुरावा पुन्हा एकदा दाखविला. बाबरी मशीद पाडून संघ परिवाराने यापूर्वीच स्वत:च्या विधिनिषेधशून्य वृत्तीची झलक दाखवलेलीच होती.

संघ परिवाराला केवळ अस्तित्वात असलेल्या गोष्टी मोडून-तोडून टाकण्यातच धन्यता वाटते आहे. यामुळेच दाभोळ वीज प्रकल्प आकाशपाताळ एक करुन शेवटी रद्द करुन घेतला. आता संघ परिवाराची खरी कसोटी आहे ती, जनतेच्या भवितव्याच्या दृष्टीकोनातून उपयुक्त असा दुसरा ऊर्जा प्रकल्प ताबडतोबीने अमलात आणण्यात.

दाभोळ वीजप्रकल्प रद्द करतानाचे जे भाषण मुख्यमंत्र्यांनी केले ते पाहता, या वीजप्रकल्पाच्या गुणवत्तेवर चर्चा न होता केवळ राजीकय सूडापोटी हा प्रकल्प रद्द केल्याचे जाणवते. ज्या प्रकारे एकाद्या मामुली प्रश्नावरुन लोक हमरीतुमरीवर येतात, त्याचप्रमाणे या ऊर्जा प्रकल्पाची चर्चा सर्वांकडून झाली. यामुळे शेवटी सामान्य जनतेच्या कल्याणाचा खेळखंडोबा होणार.

**महाराष्ट्र टाइम्स**

**९ ऑगस्ट १९९५**

# Insured Security

This is in reference to the article published in the FE of March 2 on "The Future of Insurance" by Chittaranjan Alva. I am sure the said article will prove to be an eye opener to innocent policy-holders whose hard-earned savings are likely to go into the hands of private insurance companies if the Malhotra Committee's recommendations are accepted by the Govt.

It is not secret that the Malhotra Committee report is an output to input exercise. Every attempt has been made by the Government machinery as well as private parties having vested interests to name the nationalised insurance industry a mad dog and kill it.

Despite the fact that the Indian insurance companies never enjoyed the so-called functional autonomy, they have made remarkable progress during the past 35 years.

It is unjust and unfair on the part of the Government to put the entire blame on these companies. Undoubtedly the Government itself has contributed to the present state of affairs.

By now it is an open secret that due to the poor peformance of foreign insurance companies, they are now eyeing the giant Indian insurance industry so that they may compensate their losses and kill the golden goose which has being laying golden eggs for the Indian economy.



It is important to take note of Sam Pitroda's opinion which appeared on the same page, wherein he has rightly commented on the wrong interpretation of privatisation.

Before it is too late, the common citizens should raise their voice against such mala fide so-called privatisation, otherwise once again we might face economic slavery and insurance insecurity by siphoning off the profits of policy-holders by private insurance companies.

Financial Express

Date 11-3-1995

# डोंबिवलीतील वृक्षांना तरी जगू द्या !

'रोगापेक्षा इलाज जालीम' या म्हणीची प्रचीती डोंबिवलीकरांना सध्याच्या रस्तारुंदीकरणाच्या मोहिमेमुळे येत आहे. रुंदीकरणाच्या नावाखाली डोंबिवलीतील दुर्मिळ वृक्ष सरसकट तोडले जात आहेत. झाड ही गोष्टच मुळी डोंबिवलीमध्ये औषधापुरती उरली असताना सध्याच्या वृक्ष तोडणीमुळे डोंबिवली अधिकच भकास होत आहे.

रामनगर भागात गेल्या ६० वर्षापासून अस्तित्वात असलेले वड, कैलाश, कडुनिंब यासारखे वृक्ष सध्या कुऱ्हाड पडण्याची वाट पाहात उभे आहेत. प्रत्यक्षात हे वृक्ष रस्ता रुंदीकरणाच्या मध्ये अडथळा म्हणून येत नाहीत. परंतु कल्पनाशून्य प्रशासनाच्या अवकृपेमुळे या वृक्षांवर कुऱ्हाड चालवली जाणार आहे.

सांज लोकसत्ता

२१ फेब्रुवारी १९९५



# मग 'राष्ट्रसेवक' म्हणून कशाला मिरवता?

बँका आणि विमा अधिकाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या कामाच्या जबाबदारीतून वगळण्याचा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय दुर्दैवी आहे, असे म्हणावेसे वाटते.

राष्ट्रीयीकृत बँका आणि विमा कर्मचारी खाजगीकरणाला विरोध करत असताना स्वत:स 'राष्ट्रसेवक' म्हणवून घेतात आणि प्रत्यक्षात लोकशाही प्रक्रिया बळकट करण्याच्या श्री. शेषन यांच्या प्रयत्नास योगदान देण्याची जेव्हा वेळ येते तेव्हा मग या जबाबदारीतून स्वत:स वगळण्याची मागणी करतात.

सार्वजनिक उपक्रमातील कर्मचाऱ्यांच्या अशा प्रकारच्या सोयीस्कर दुटप्पी भूमिकेमुळेच एकूण समाज प्रवाहापासून हे कर्मचारी वेगळे पडत आहेत. त्यामुळेच खाजगीकरणाविरुद्ध त्यांच्या लढाईला त्यांना सामान्य माणसाची साथ मिळत नाही. सर्वोच्च न्यायालयाचा सदर निर्णय अशावेळी जाहीर झाला आहे की कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कामाच्या वेळात सूट घेऊन निवडणूक कामाचे प्रशिक्षण घेतले होते आणि प्रत्यक्षात निवडणूक आयोगाची कामे पार पाडण्याची वेळ आली तेव्हा मात्र न्यायालयाच्या निर्णयामुळे त्यांना या कामातून वगळण्यात आले. त्यामुळे बँकांच्या कामावर विपरीत परिणाम तर झालाच शिवाय या कर्मचाऱ्यांना विशेष दर्जासुद्धा प्राप्त झाला. परंतु हे लोक 'विशेष' अजिबात नाहीत.

सांज लोकसत्ता

२० फेब्रुवारी १९९५

# National glory

I am proud that Sushmita Sen has become Miss Universe. Undoubtedly her success had fetched an unprecedented glory to our country, the 'land of love', as she aptly put it.

Sushmita's success is a tribute to the Indian womanhood and its culture.

The Independent

26-5-1994



# विश्वसुंदरी स्पर्धेकडे पाहाण्याचा दृष्टीकोन तपासावा लागेल

ऐश्वर्या रायने विश्वसुंदरीचा किताब पटकावला. भारतीय युवती विश्वसुंदरी झाली याचा अभिमान नक्कीच वाटला, पण या स्पर्धत विश्वसुंदरींनी आतापर्यंत दिलेली उत्तरे ऐकता त्यांनी केवळ उच्च आदर्शवादी मूल्यांचे प्रदर्शन केले व किताब पटकावले असे दिसते. त्यामुळेच अशा स्पर्धकडे पाहण्याचा दृष्टिकोन तपासून घ्यावा लागेल.

सुश्मिताने या स्पर्धेत गतवर्षी जे उत्तर दिले त्यावेळी कलकत्यातील डाव्या विचारांच्या लोकांनी निषेध व्यक्त केला. त्यावेळी त्यांच्या निषेधामुळे अरसिक म्हणून त्यांची टर उडवली गेली. पण, यावेळी ऐश्वर्यासह अन्य युवतींनी दिलेली उत्तरे लक्षात घेता 'डाव्या' लोकांचा विरोध योग्य वाटतो.

या स्पर्धेवर आतापर्यंत अनेक वेळा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून टीका झाली. कोणी महिलांच्या भूमिकेतून तर कोणी चंगळवादी संस्कृती जोपासली जाते, म्हणून टीका केली. त्यामुळेच अशा प्रकारच्या आक्षेपापासून बचाव करण्यासाठी या स्पर्धेच्या चतुर आयोजकांनी, सौंदर्याबरोबर उगीचच मानवतावादी मूल्यांचे शेपूट जोडले असे वाटते. इतक्या विश्वसुंदरींमध्ये मानवतावादी काम केलेल्या किती आहेत हा प्रश्न म्हणूनच पडतो.

विश्वसुंदरी स्पर्धे इतकी दांभिक स्पर्धा दुसरी कोणती नसेल. कारण विश्वसुंदरीची ही अशी एकमेव स्पर्धा असेल की जी खरी म्हणजे केवळ शारीरिक सौंदर्याची स्पर्धा आहे पण लोकांच्या आक्षेपापासून बचाव करण्यासाठी उगीचच हजरजबाबीपणा दाखविण्यासाठी आदर्शवादी मूल्यांचे दांभिक प्रदर्शन केले जातं. लहानपणापासून पंचतारांकीत संस्कृतीत वाढलेल्या या स्पर्धक युवतींच्या सामाजिक जाणीवांना असं अचानक टोक येताना पाहताना हसू येतं व या प्रकारच्या सोहळ्यातून दांभिकतेचे गौरवीकरण होत असल्याचे पाहून वाईट वाटते.

सांजलोकसत्ता

२६-०४-१९९४

# In support of Sonia

The Independent of December 24 prominently displayed a report on Sonia Gandhi's visit to Kochi and Amethi. But it referred on her, once again, as the 'Italian-born' widow of the late Rajiv Gandhi. Surely Sonia Gandhi has earned an identity for herself?

After all, in her capacity as chairperson of the Rajiv Gandhi Foundation, Sonia Gandhi has thrown herself into social work and carved a niche for herself. Particularly after her recent visit to the earthquake-affected areas, the average Indian has begun to appreciate her concern.

Please desist from such remarks in future.

The Independent - Bombay
29-12-1993



# Privileged lot

Sir: This has reference to the article titled "AGM's turning into brawls" by P.N. Vijay (ET, October 4). The attempt to unveil the realities deserves to be complimented. However, some issues have not been featured in the article, supposedly owing to the modesty of the writer and in his bid not to hurt the sentiments of the "professional shareholders". I had the opportunities to attend the annual general meetings of several companies and would like to share my experience based on the same.

There is a group to whom I am referring to as "professional shareholders" who have holdings in almost each of the listed companies. They normally belong to the retired category and attend AGMs as a hobby to just pass their time. It appears to be their obsession to attend the meetings and speak threat; howsoever insignificant point they might have. These people feel highly satisfied when they find their names appear in the Minutes of the meeting.

Time and again these persons keep on asking about gifts and eatables. I have myself seen the mad rush for the snack packets while the chairman's speech is on. Many of these persons make it a point to call upon the executives of the company under the guise of collecting details and get satisfied with a five star lunch. Some cunning shareholders are reported to have approached the company to strike a deal for not pressing a particular objection or a point.

Many shareholders raised almost trivial queries which hardly has any relevance. But being their day, the chairman is made to obey such dictates. These shareholders are not even bothered to get the answers for their queries. After finishing their speech they rush to some other meeting without waiting for the answers.

It is high time to view the entire situation a bit seriously. Merely having some shares in the company should not entitle a person to outrage a person of the calibre of Mr. Nani Palkhivala or Mr. J.R.D. Tata. I have also seen some shareholders making intelligent points and the same being well taken and appreciated by the board. But such events are rare. Shareholders democracy is turning into shareholders tyranny. No one would like to defend the shortcomings and irregularities of the management, none the less some regulatory measures need to be introduced in curbing this right of shareholders which is often abused.

Non-voting shares is thus a welcome step in the offing. Unless timely steps are taken, we may land up in a situation where the very need of AGM will be questioned in company circles.

The Economic Times
19th October 1993



# म्हणे आम्ही सुसंस्कृत नागरिक !

अतिशय प्रभावी आणि पोट तिडकोने लिहिलेला १२ ऑक्टोबरचा 'हा बेशरम कट उधळून लावा' हा अग्रलेख वाचून स्वत:ची लाज वाटायला लागली आहे. इंग्रजीत एक वाक्प्रचार आहे. 'प्रजेला तिच्या लायकीनुसार राज्यकर्ते मिळतात' या उक्तीनुसार आमच्यासारख्या नागरिकांना जर गुंडांना पाठीशी घालणारे राज्यकर्ते आणि विरोधी पक्ष मिळाले असतील तर मी स्वत:ला सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक कसा म्हणून घेवू?

उद्याच्या पिढीला कोणत्या भयानक परिस्थितीला तोंड द्यावं लागणार आहे, याची दाहक जाणीव या निमित्ताने झाली आणि अंगावर काटा आला. आमच्यासारख्यांच्या डोळ्यासमोर ही परिस्थिती विशद केल्याबद्दल 'महानगर'चं अभिनंद !

आपलं महानगर
२१ ऑक्टोंबर १९९२

## कल्पकतेच्या मर्यादा

जगप्रसिद्ध स्वरसम्राज्ञी लता दीदींच्या सत्कार समारंभानिमित्त महाराष्ट्र शासनाने जो कार्यक्रम शिवाजी पार्क येथे आयोजित केला होता, त्यातून मराठी माणसाच्या दृष्टिकोनाच्या आणि कल्पकतेच्या मर्यादा स्पष्ट झाल्या. लता मंगेशकर हे व्यक्तिमत्त्व जागतिक मान्यता प्राप्त असं व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या वाढदिवसाचा कार्यक्रम जगामधील सर्व नागरिक पाहू शकतील, अशा दृष्टिकोनातून आयोजित करायला हवा होता. सध्याच्या सॅटेलाईटच्या जमान्यात हे सहज शक्य होतं. हा कार्यक्रम भारताच्याच नव्हे, तर संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यामध्ये गेला असता, तर लता दीदींच्या कार्याचा खऱ्या अर्थाने उचित गौरव झाला असता.

आपलं महानगर
१६ ऑक्टोंबर १९९२



## इंदिरा गांधींवर अन्याय

'नरसिंह रावांची पहिली परीक्षा' हा २४ जूनच्या अंकातील अग्रलेख इंदिरा गांधींवर अन्याय करणारा आहे.

मूळ पंजाब प्रश्न श्रीमती इंदिरा गांधी यांनी घेतलेल्या हरित क्रांतीच्या निर्णयामधून झाला आहे; कारण हरित क्रांतीच्या यशस्वी अंमलबजावणीमुळेच पंजाब अत्यंत श्रीमंत राज्य म्हणून उदयास आलं आणि हीच गोष्ट परकीय हस्तक्षेपास कारणीभूत ठरली. परकीय शक्तीच्या मदतीने पंजाबमध्ये अतिरेकी बनविण्याचे कारखाने सुरु करण्यात आले. अर्थात या सर्वांस पंजाबमधील स्थानिक समाजदेखील जबाबदार आहे; कारण आर्थिक सुबत्ता जर नीटपणे पचनी पडली नाही तर बऱ्याचवेळा विकृती निर्माण होते व अशाच प्रकारच्या विकृतीमुळे पंजाबमधील शीख जमातवाद पोसला गेला आणि पंजाबचं दुखणं सुरु झालं.

परकीय हस्तक्षेपाबद्दल नुसती टिंगल करून दुर्लक्ष करता येणार नाही. इंदिरा गांधी, राजीव गांधी आणि भारतीय उपखंडातील अनेक लोकप्रिय नेत्यांची निर्घृण हत्या होऊनदेखील आपण परकीय हस्तक्षेपाबद्दल पुरेसे जागरूक झालो नाही. सुपर ३०१ किंवा भारतीय लष्कराबद्दलचा अमेरिकन अहवाल हा परकीय हस्तक्षेपांबद्दलचा बोलका पुरावा आहे. या दोन्ही गोष्टींवर फार मोठ्या प्रमाणामध्ये जनजागृती आणि आंदोलन होण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या प्रबोधनामधूनच जमातवादापासून सामान्य लोक दूर जातील आणि मूळ प्रश्नावर लक्ष केंद्रित होईल.

शेवटी, जर पंजाबचा प्रश्न श्रीमती इंदिरा गांधीचं पाप आहे असं मानलं तर मग अन्नधान्यांचं विक्रमी उत्पादन, तंत्रविज्ञानामधील भारताची आश्चर्यजनक कामगिरी आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताची वाढलेली शान, विमा, बँका, कोळसा आदी उद्योगधंद्यांचं

राष्ट्रीयीकरण, एशियाडसारखे क्रीडा महोत्सव, दक्षिण ध्रुवावरील भारताचं पदार्पण आदी घटनादेखील पापच मानावं लागेल आणि असा विचार करणं म्हणजे स्वत:चा अपमान करून घेण्यासारखं ठरेल.

त्यामुळे इंदिराजींनी पंजाब प्रश्न निर्माण केला. असं म्हणण्याअगोदर पंजाबच्या संपूर्ण पार्श्वभूमीचा अभ्यास होणं महत्त्वाचं आहे.

आपलं महानगर
९ जुलै १९९१



## सुटका नाही

थोडंसं 'सौदेबाजी' या अग्रलेखाबद्दल.

सौदेबाजीपासून कुणाचीच सुटका नाही. अगदी राजकीय पक्षातून ते सेवाभावी संस्थेपर्यंत प्रत्येक जण व्यावहारीक तडजोडीच्या नावाखाली एक प्रकारची सौदेबाजीच करत असतो तेव्हा निव्वळ सौदेबाजी केली म्हणून टीका करण्यात हशील नाही.

टीका करायचीच झाली तर ती त्या अंतस्थ हेतूवर करावी की जो हेतू ती सौदेबाजी करण्यास भाग पाडतो. फॅसिस्ट वृत्ती बोकाळू नये म्हणून जर कॉंग्रेस-रिप. पार्टीने सौदेबाजी केली तर ती टीका योग्य नाही. कारण जर आपण आपणांस सुसंस्कृत म्हणवून घेत असू तर आपणांस भ्रष्टाचारी लोकांपेक्षाही स्वत:च्या जातीचा अहम बाळगणाऱ्याविषयी जास्त तिटकारा वाटला पाहिजे. कारण आजच्या घडीला समाजातील प्रत्येक घटक कुठल्या ना कुठल्या तरी भ्रष्टाचारास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जबाबदार आहे.

शेवटी जाताजाता एक गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे कॉंग्रेस राजवटीमुळेच झालेल्या प्रगतीची फळे तिच्यावर टीका करणं म्हणजे डोळ्याला झापडलावण्यासारखेच आहे.

आपलं महानगर
१ फेब्रुवारी १९९०

## हाश्मी समारोहात खटकलेली गोष्ट

मुंबईतील जांबोरी मैदानावर १८ एप्रिलला झालेला 'सफदर हाश्मी स्मृति समारोह' कर्तव्यनिष्ठेतून पाहिला. श्री. सफदर हाश्मी यांची ज्या परिस्थितीत हत्या झाली ती गोष्ट निश्चितपणे सुसंस्कृत समाजाला लाजिरवाणी आहे. म्हणून तिचा निषेध तेवढाच प्रखरपणे झाला पाहिजे. हा निषेध प्रकट करण्यात आयोजक व कलाकार यशस्वी झाले आहेत. खटकण्यासारखी एकच गोष्ट वाटत होती, ती म्हणजे कलाकार जर कलाप्रकार हे माध्यम सफदर हाश्मी यांच्या हत्येचा निषेध व्यक्त करण्यासाठी वापरत असतील, तर त्यात एका 'कलाकाराची' हत्या झाली, ही गोष्ट प्रामुख्याने पुढे यायला हवी होती. परंतु त्या दिवशीच्या सर्व कलाविष्कारांमधून असे वाटत होते की, या हत्येचे राजकीय भांडवल करण्याचा प्रयत्न होत आहे. राजकीय भांडवल करण्यासदेखील हरकत नाही, पण मग तो निषेध कोठल्याही राजकीय पक्षाच्या व्यासपीठावरून किंवा एखाद्या झेंड्याखाली झाला पाहिजे, त्यासाठी कोठलाही कलाप्रकार वापरता कामा नये.

कलावंत हे समाजातील सद्सद्विवेकबुद्धी जपत असतात. त्यामुळे समाज त्यांच्याकडून कोठल्याही प्रश्नाच्या दोन्ही बाजूंच्या मतांची अपेक्षा करतो. त्या दिवशीच्या पथनाट्यातून असे चित्र साकार करण्याचा प्रयत्न होत होता की जणू सद्य परिस्थितीस फक्त केंद्र सरकार व त्यातूनही श्री. राजीव गांधीच जबाबदार आहेत. मला वाटत नाही की कोणताही समतोल विचार करणारा नागरिक ह्या निष्कर्षाला दुजोरा देईल.

महाराष्ट्र टाइम्स
५ मे १९८९



## काही अप्रकाशित पत्रं

## विजयी पक्षाची मरगळ !

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला मुंबईत घवघवीत यश मिळूनसुद्धा प्रदेश काँग्रेस संघटनेमधलं निरुत्साही वातावरण कायमच आहे. खर म्हणजे सहा पैकी पाच जागा जिंकणाऱ्या काँग्रेस पक्षातर्फे मतदारांचे आभार मानण्यासाठी एका विशाल जनसभेचे आयोजन होणं अपेक्षित होतं, परंतु दुर्दैवान काँग्रेसचे पदाधिकारी या दृष्टीने काही प्रयत्न करताना दिसत नाही. केंद्रात आणि राज्यात सत्ताधारी असलेल्या पक्षाला अशा प्रकारची मरगळ परवडणारी नाही.

पक्षाच्या राजकीय विचारांच्या प्रसारासाठी कष्ट उपसण्याची इच्छाशक्ती काँग्रेसचे पुढारी हरवून बसले असावेत. जोपर्यंत गांधी-नेहरू परीवारातील व्यक्ती मेहनत घेत आहेत तोपर्यंत पक्ष वाढवण्याची आपलीही काही जबाबदारी आहे असं काँग्रेसजनांना वाटत नाही. या उलट केंद्रातील सत्ता जाऊनसुद्धा मराठवाड्यातील विजयी खासदारांची जंगी सभा भाजपातर्फे आयोजित होते. जॉर्ज फर्नांडीससारख्या व्यक्तीचा तोरा अद्याप कायम राहतो आणि मुंबईतील सेना-भाजपाचे पराभूत उमेदवार अभिमानाने मतदारांचे आभार मानतात.

जनमताचा पाठींबा नसताना देखील भाजपासारखा पक्ष किती सतर्क आणि सक्रिय आहे याच भान काँग्रेसच्या पुढाऱ्यांना केव्हा येणार हा खरा प्रश्न आहे.

**लोकसत्ता**

२ जून २००४



## रामभाऊ नाईकांना विनंती

भाजपाचे उत्तर मुंबईतील उमेदवार श्री. राम नाईक यांना मतदारांनी यंदा संसदेत पाठवण्याऐवजी घरचा रस्ता दाखवला. वाजपेयी-अडवाणी यांच्या नंतर हमखास निवडून येण्याची खात्री असलेले राम नाईक यांच्या पराभवाची चर्चा यापुढील पाच वर्ष सुरुच राहील. आपल्या प्रदिर्घ राजकीय वाटचालीमध्ये श्री. राम नाईक यांनी प्रचंड चढउतार बघीतले असल्यामुळे त्यांना स्वत:ला या वेळेच्या पराभवाच विशेष काही वाटणार नाही. लवकरच रामभाऊ लोकांच्या प्रश्नांसाठी स्वत:ला झोकून देतील या विषयी सर्वांना खात्री आहे. त्याची सुरवात त्यांनी गोरेगांव पूर्व स्थानकाबाहेरील वाहतुकीच्या कोंडीपासून करावी अशी माझ्या सारख्या सामान्य नागरीकांची अपेक्षा आहे.

रेल्वेच्या हद्दीतच संपर्क कार्यालय थाटणाऱ्या रामभाऊंनां गोरेगांव स्थानका बाहेरील सध्याच्या बजबजपूरी बद्दल माहीती आहेच. फेरीवाले आणि वाहतुकीची कोंडी यामुळे गोरेगांव स्थानका बाहेरील परीसर मृत्यूचा सापळा बनला आहे. या पार्श्वभूमीवर रामभाऊंच्या कार्यालयाचा परीसर मात्र सुशोभीत आणि सुरक्षित असतो याबद्दल अनेकांना सुक्ष्म असुया वाटत होती. आता ज्यावेळी खासदारकी सुद्धा गेली असतांना रामभाऊं त्यांच्या कार्यालयाचा परीसर जनसामान्यांच्या वापरासाठी करून देतील अशी अपेक्षा आहे. या परीसरात रिक्षा आणि टॅक्सींसाठी वाहनतळ उभारावा की ज्यामुळे हजारो गोरेगांवकर रामभाऊंना दुवा देतील.

**लोकमत**

१८ मे २००४

## व्यवस्थेमधला आपला सहभाग – लोकशाही

''दुसऱ्याला जबाबदार धरण्याच्या वृत्तीचे परिणाम'' या पत्राद्वारा (म.टा. २५-११-९८) श्री. महेश साळुंखे यांनी सद्याच्या गुंतागुंतीच्या परिस्थितीचे अचुक मापन केलेआहे. बिरबल बादशहाच्या एका सुप्रसिद्ध गोष्टीनुसार ज्या प्रमाणे घोडा का बुजतो? पानं का कुजतात? भाकरी का करपते? या सर्व प्रश्नांचे उत्तर जस एकच आहे, (न फिरवल्यामुळे) त्याच प्रमाणे सध्याच्या सर्व समस्यांच, मुळ कारण स्वत:ची जबाबदारी झटकून टाकण्याच्या वृत्तीमध्येच आहे.

ज्या लोकशाही समाज रचनेचे आपण सर्वजण भागीदार आहोत त्या व्यवस्थेचे हे एक वैशिष्ट्य आहे की, इथल्या सर्व बऱ्या वाईट घडामोडींची जबाबदारी इथल्या प्रत्येक व्यक्तीची आहे. हल्ली कोणत्याही प्रश्नावर उत्तर शोधावयाचे म्हणजे त्या प्रश्ना मधला स्वत:चा सहभाग विसरून दुसऱ्यावर टिका करावयाची अशी एक अलोकशाही प्रथा सर्वत्र सुरु झाली आहे. अशा प्रकारच्या प्रवृत्तीमुळे कोणत्याच समस्यांचे निराकरण तर होत नाही पण आपण पुन्हा एकदा सरंजामशाहीकडे किंवा लष्करशाहीकडे वाटचाल करायला लागु. या दुर्दैवी शक्यते पासून स्वत:चा बचाव करावयाचा झाल्यास लोकशाही प्रक्रियेचा सक्षमपणे अभ्यास करावा लागेल. अशा अभ्यासामधूनच सर्व सामान्यांचा संपुर्ण व्यवस्थेमधील सहभाग वाढीस लागेल. आणि मगच अनेक प्रलंबित समस्या मार्गी लागतील.

महाराष्ट्र टाइम्स
२७ नोव्हेंबर १९९८



## प्रकाशनें शांगीक्रांऋची

| | |
|---|---|
| कळ्या प्राजक्ताच्या | क्रांती पाटकर (१९८७) |
| जुडी एकवीस दुर्वांची | क्रांती पाटकर (१९९४) |
| मुठभर चणे | शांताराम पाटकर (१९९५) |
| उतू गेलेले दूध | शांताराम पाटकर (१९९८) |
| रिकामी घागर | शांताराम पाटकर (१९९८) |
| शब्दे वांटू धन जनलोकां | शांताराम पाटकर (१९९९) |
| साठवण एक वृद्धाची | शांताराम पाटकर (२००१) |
| पानगळ | शांताराम पाटकर (२००२) |
| आरत्या विघ्नहर्त्याच्या | शांताराम पाटकर प्रथम आवृत्ती (२६-१-२००३) |
| गेलं सांगायचे राहून | शांताराम पाटकर (२००३) |
| मुक्त-हस्त चित्र | अमोल पाटील (२७ जुलै २००३) |
| आरत्या विघ्नहर्त्याच्या | शांताराम पाटकर द्वितीय आवृत्ती (२००४) |

सप्रेम मनस्कार
सुनील वालावलकर
७ जुलै २००४